# १.

# भाषेची उत्पत्ती व विकास

## (विकारविचार प्रदर्शनाच्या साधनांची इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांती)

१. मनात संकल्पविकल्प येतात. त्यांचे प्रदर्शन मनुष्यादी प्राणी अनेक तऱ्हांनी करतात. मुख, दंत, जिव्हा, नासिका, कर्ण, नेत्र, हस्त, पाद व इतर अंगे यांच्या विक्षेपांनी संकल्पविकल्प दाखविता येतात किंवा दिसले जातात. या साधनाला विक्षेपसाधन म्हणतात. हे साधन सर्वात साधे. या विक्षेपसाधनाला जल, वायु, अग्नी, आकाश, वगैरेंचे साह्य लागत नाही. मुखाने वेडावणे, दांत काढणे, स्मित करणे, जिभळ्या दाखविणे, मिशीवर हात फिरविणे, केस पिंजारणे, माथा तुकविणे, भुवया चढविणे, कपाळाला आठ्या घालणे, कान टवकारणे, गाल फुगवणे, नाक चढवणे किंवा फेंदारणे, डोळे मिचकावणे, फाडणे, लाल करणे, हातवारे करणे, आंगठा दाखविणे, बोटे मोडणे, मूठ दाखविणे, हात चोळणे, लाथ मारणे, वाकुल्या दाखविणे, शेपूट हलवणे, खुराने जमीन करणे, पंख फडफडविणे, फणा आपटणे, सोंड फिरविणे, लंगडशाई करणे, नाचणे, उडणे, बागडणे, धावणे, उताणे पडणे, कुशीवर पडून मेल्याचे सोंग घेणे, लोळणे, नमणे, नमस्कार करणे, वगैरे. संकल्पविकल्प दाखविण्याचे शेकडो प्रकार साध्या विक्षेपात पडतात. बोलणे, सूर काढणे, हसणे, हुंगणे, खाजवणे, टाळी वाजविणे, खाक वाजविणे, चुटक्या वाजविणे, शीळ घालणे, फू करणे, थुंकणे, खेकसणे, आरडणे, बोंबलणे, शंख करणे, खिदळणे, बळेच पादणे, गुरगुरणे, केकाटणे, कोकणे, भोंकणे, आवरणे, चिवचिवणे, किचकिचणे, दात खाणे, जीभ टाळूवर आपटणे, सुसकारणे, कोल्हेकुई करणे, हंबरणे, टिवटिवणे, मचमचणे, ललकारणे, गुणगुणणे, तणतणणे, फणफणणे, कटकटणे, हळहळणे, तळतळणे, थयमान करणे, चुंबन करणे, चाटणे, आलिंगणे, कुरवाळणे, चिमटे काढणे, गुध्धे मारणे, रट्टे देणे, लाथाडणे, ढकलणे वगैरे शेकडो प्रकारात स्वेतर व्यक्ती,

पृथ्वी, जल, वायु, आकाश वगैरे बाह्य पदार्थांचे साह्य घेऊन संकल्पविकल्प दाखविले जातात. हा दुसरा प्रकार मिश्र आहे. हे दोन्ही प्रकार सर्वस्वी सहज म्हणजे जन्मसिद्ध असून मनुष्यातल्याप्रमाणेच पशुपक्ष्यादीतही दृष्टीस पडतात. हे कोणी कोणाला शिकवावे लागत नाहीत. कारण प्राण्यांच्या त्या त्या अवयवांचे हे धर्मच आहेत. प्राणित्वाची घटनाच अशी आहे की आंतर किंवा बाह्य कारणांचा आघात झाला असता प्रत्याघात या प्रकारांचे रूप घेऊन अवश्यमेव प्रगट होतो. उपरिनिर्दिष्ट सर्वच विशेष सर्वच प्राण्यांत प्रादुर्भूत होतात असे नाही. आनंदाने किंवा कृतज्ञतेने किंवा समाधानाने लांगूलविक्षेप कुत्र्यांत उत्कटत्वाने दृश्यमान होतो. लांगूलाभावास्तव मनुष्यात हा विशेष संभाव्यच नाही. हसणे मनुष्यास शक्य आहे, पण कान टवकारणे प्रायः नाही. प्रायः म्हणण्याचे कारण असे की कानाचा शिरा हलविण्याचे सामर्थ्य क्वचित् मनुष्यांत आढळून आल्याचे ग्रंथातरी लिहिलेले आठवते. सांगण्याचा मुद्दा एवढाच की वर नमूद केलेले विशेष प्राणिमात्रांत सहज ऊर्फ जन्मसिद्ध असतात, कृत्रिम ऊर्फ यत्नसिद्ध नसतात.

२. सहज विक्षेपांचे प्रत्यभिज्ञान होऊन, यत्नाने त्यांची पुनरावृत्ती करण्याची बुद्धी होणे ही या पुढची पायरी आहे. हा गुण मनुष्याइतका दुसऱ्या प्राण्यात वर्धमान झालेला दिसत नाही, किंबहुना दुसऱ्या प्राण्यात हा गुण बहुतेक नाहीच म्हटला तरी चालेल. विक्षेपांचे शास्त्र बनविण्याचे सामर्थ्य एवढ्या मनुष्य प्राण्यानेच तेवढे दाखविलेले आढळते. पूर्वी केलेला विक्षेप ज्ञानतः पुनः करणे म्हणजे पुनरावृत्ती सामर्थ्य एकट्या मनुष्यातच दिसून येते ही पुनरावृत्ती तो आपल्या स्वतःच्याच विक्षेपाची करतो असे नाही, इतर प्राण्यांच्या विशेषांची ही पुनरावृत्ती तो करू शकतो. म्हणजे अनुकरणसामर्थ्य त्याच्या ठायी विलक्षण आहे. विक्षेपांपैकी हालचालींचीच तेवढी पुनरावृत्ती मनुष्य करून थांबत नाही, तर त्या त्या प्राण्याच्या विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती व अनुकरण करून त्या त्या प्राण्याची ओळख तो इतर मनुष्यांना पटवून देतो. मनुष्य शब्दानुकरण करू लागला म्हणजे त्या त्या प्राण्याला त्या त्या प्राण्याच्या शब्दावरून तो नाव देऊ लागतो. येथेच मनुष्याला प्राण्यांचे नामकरण करण्याचा शोध लागतो. काव्काव् करणाऱ्या पाखराला काकः, किः खिः करणाऱ्या माकडाला किखिः रू रू आवाज करणाऱ्याला रुरुः, भृंग् आवाज करणाऱ्याला भृंगः, अशी शब्दांवरून प्राण्यांना नावे तो देतो. कृकवाक्, कोकिल, कुकुट, फेरव, कुक्कुर, करेटु, क्रकर, चिल्ल, कीर, कुरर, केकी, मयूर, तित्तिरिः, ही सर्व प्राणिनामे शब्दानुकरणजन्य आहेत. कित्येक नामात कर वगैरे प्रत्यय लावलले आहेत व कित्येकात केवळ शब्दच प्राणिवाचक केला आहे. कर, कुर, र, इन्, रव इत्यादी प्रत्ययान्त जी प्राणिनामे आहेत ती कर करणे, कुर आवाज करणे, इन् जवळ असणे, रव आवाज करणे या धातुनामांचा शोध लागल्यानंतरची असल्यामुळे ती प्रत्ययान्त नामे काक, कृकवाक्, चिल्ल, कीर या अप्रत्ययान्त नामांहून अर्वाक्तन आहेत हे उघड आहे. केवलशब्दजन्य प्राणिनामे सर्व नामात अत्यंत जुनाट ऊर्फ प्राथमिक होत. प्राथमिक म्हणजे केव्हाची? तर मनुष्याला हे प्राणी प्रथम भेटले तेव्हाची. कोणत्या मनुष्याला? संस्कृत किंवा वैदिक भाषा बोलणाऱ्या मनुष्याला

की इतर पूर्वकालीन मनुष्याला? हा प्रश्न सुटावयाचा म्हणजे त्या त्या प्राण्याचे मूळ वसतिस्थान किंवा जन्मस्थान कोणते त्याचा निश्चय झाला पाहिजे समजा की हिमालयोत्तर प्रदेशात कावळा नाही व हिमालयदक्षिणप्रदेशात आहे. तसेच अशी ही कल्पना करा की वैदिकभाषा बोलणारे ऋषीचे मूलस्थान हिमालयोत्तरमेरूपर्वतावर होते. तर काक हा शब्द हिमालयाच्या दक्षिणेस उतरल्यावर वैदिक ऋषीच्या भाषेत आला असे अनुमान सहजच निघते. हा काक शब्द ऋषींच्या पूर्वीच्या रानटी जातीत निर्माण झालेला ऋषींनी उचलला असेल व तो बराच जुना ठरेल. जुना म्हणजे एक लाख किंवा पाच लाख वर्षांचाही जुना ठरेल. भूस्तरशास्त्राप्रमाणे मनुष्य या पृथ्वीवर वावरत असलेल्याला लाखो वर्षे लोटून गेली आहेत. या लाखो वर्षात त्याची प्रगती अत्यंत मंदगतीने होत असलेली अनुमानास येते. भाषणादी मुखविक्षेप तो आज लाखो वर्षापासून करीत आला आहे व विशिष्ट ध्वन्यादी आघातांकडून वस्तूंना नामे देण्याचा शोध त्याला लाखो वर्षांच्या पूर्वीच लागलेला आहे. नवनवे प्राणिशब्द कानावर पडताच भाषेत नवी प्राणिनामे वेळोवेळी तो बनवीत आल्याचे भाषेतिहासावरून व व्युत्पत्तीवरून दृष्ट्युत्पत्तीस येते. तात्पर्य, प्राणिशब्दजन्य प्राणिनामे अत्यंत जुनी. संस्कृत किंवा वैदिकभाषेतील अत्यंत जुनी असे म्हणण्याचा आशय नाही; तर मानववंशातील कोणत्यातरी त्या किंवा शेजारच्या शाखेतील माणसांच्या भाषेतील अत्यंत जुनी. वैदिकऋषींना काकशब्द हिमालयदक्षिणप्रदेशांत आल्यावर माहीत झाला असेल. परंतु ऋषींच्या पूर्वीचे जे रानटी लोक या देशात होते त्यांच्या भाषेत तो रूढ व जुना होता. अप्रत्ययान्त केवळ शुद्ध शब्दजन्य जी प्राणिनामे ती अत्यंत प्राथमिक धरण्याचे कारण असे आहे की शब्दज्ञान हे, स्पर्शज्ञान वगळले असता सर्व ज्ञानात अत्यंत प्राथमिक असते व ते कर्णेंद्रियांवरती आघात भानगडी वाचून करते. एका आकाशतत्वाचे तेवढे साहाय्य या ज्ञानाला पुरे होते. रंगावरून, गतीवरून किंवा क्रौर्यादी गुणांवरून जी ज्ञाने होतात त्यांना पृथ्वी, तेज, वायु इत्यादी अनेक मिश्र उपाधींचे साहाय्य लागते. स्वल्पश्रमाने बहुत लाभ करून घेण्याचा प्राणिमात्राचा स्वभाव पहाता, शब्दजन्यप्राणिनामे सहज सुचणारी अतएव सर्वांत पुरातन समजणे न्याय्य होते. रात्र असो, दिवस असो, प्राणी दिसो वा न दिसो, शब्दावरून त्याचे अस्तित्व मनुष्याला प्रतीत होते. अस्तित्व प्रतीत झाल्यावर, तो शब्द करणाऱ्या प्राण्याची ओळख इतर मनुष्यांना पटविण्याकरता किंवा तो प्राणी अंतर्धान पावला असता त्याच्या संबंधाने इतरांशी बोलताना, कर, कुर, इन्, इत्यादी प्रत्यय न लावता (कारण, प्रत्यय त्या काळी अस्तित्वातच आलेले नसतात) त्या प्राण्याच्या शब्दांचे होईल तितके हुबेहुब अनुकरण करून त्या प्राण्याची आठवण इतरांना करून देण्याची खटपट मनुष्य करतो. येथे केवळ गुणाने गुणांचा निर्देश करण्याचा शोध मनुष्याला सहजगत्या होतो. गुण आणि गुणी यांच्यामधील भेद याकाळी त्याला होत नाही. शब्दांवरून प्राण्यांना ज्याप्रमाणे तो नामे देतो त्याचप्रमाणे तो रहातो त्या टापूतील एकोनएक ध्वनी ज्या सजीव पदार्थांपासून साक्षात् निघतात किंवा निघाले अशी त्याची समजूत होते. त्या ध्वनीवरून नदी, धबधबा, झाड, मेघ इत्यादी

सजीव पदार्थांना तो नामे देतो. यातऱ्हेने पदार्थदर्शक शेकडो ध्वनींचा साठा मनुष्याजवळ सांचतो. मनुष्याचा हाच पहिला शब्दकोश होय. या सजीवपदार्थदर्शक ध्वनीबरोबरच धडपडणे, घोरणे, हुंगणे, फरपटणे, कुरकुरणे, थापटे, थापटणे, इत्यादी क्रियांचेही ध्वनी तो ओळखू व नामाथू लागतो व त्या क्रियांचे नामकरण त्या ध्वनींनी करतो. विशिष्ट ध्वनींनी विशिष्ट पदार्थ व क्रिया यांचे विशिष्ट निर्देशन व प्रत्यभिज्ञान करून देण्याचे सामर्थ्य ज्याकाळी त्याला येते त्याकाळी भाषा म्हणून जिला म्हणतात तिची दोन मुख्य अंगे - नाम व क्रिया यांचे दर्शक ध्वनी - यांचा अपूर्व शोध त्याला लागतो. येथेच परिपूर्ण भाषा निर्माण झाली. भाषा म्हणजे दुसरे तिसरे काही नाही, मुखातून निघू शकणाऱ्या शब्दांनी क्रियांचे व पदार्थांचे आविष्करण करण्याची कला. ध्वनी काढण्याला तोंड व ते ऐकण्याला कान या दोन इंद्रियांची साधने या कलेला बस्स होतात आणि ही दोन्ही साधने बहुतेक प्रत्येक मनुष्यापाशी असतात.

३. अनुकरणात्मक ध्वनींच्याद्वारा आपले मनोगत दुसऱ्यांना कळविण्याचा किंवा आपले भूत मनोगत वर्तमानकाली स्वतःचे स्वतःला प्रत्यक्ष करण्याचा हा शोध मनुष्यमात्राच्या प्रगतीच्या इतिहासात मोठा क्रांतिकारक झाला. ज्या समाजात हा शोध प्रथम झाला त्या समाजाला ज्यांना हा शोध अद्याप झाला नव्हता त्या समाजावर हरएक प्रकारे वर्चस्व मिळाले. टेलिग्रामने मनोगत कळविता येणाऱ्या सध्याच्या पाश्चात्यांना तदनभिज्ञ हिंदू, नीग्रो, चिनी इत्यादी पौरस्त्यांवर जे वर्चस्व मिळालेले आपण पहातो त्याच अपूर्व मासल्याचे वर्चस्व अनुकरणात्मक ध्वनींच्या भाषेचा शोध लावणाऱ्या समाजांना मिळाले. परंतु, कोणत्याही शोधाप्रमाणे हा शोध अपुरा भासू लागला. ध्वनी ज्यापासून ऐकू येईल त्या पदार्थांचे व क्रियांचे नामकरण करता आले हे काही थोडाथोडका लाभ झाला असे नव्हे. परंतु, ध्वनी ज्यांना नाही असे पदार्थ व वस्तू असंख्य राहिल्या. या असंख्य अध्वनी वस्तूंचे व क्रियांचे प्रदर्शन येथपर्यंत हावभावाने होत असे. कावळा मांस खातो, हा आशय कळविण्याला अनुकरणार्थक काक हा शब्द उच्चारावा, अध्वनी जे मांस त्याचा तुकडा दाखवावा, खाण्याची क्रिया बक, भक, भक्ष या अनुकरणात्मक ध्वनीने ऐकवावी व वर्तमानकालाचा बोध हात किंवा बोट खाली करून दर्शवावा, इतका खटाटोप करावा लागे. ध्वनी व हावभाव यांचे मिश्रण करून मनोगत कळविण्याची ही तऱ्हा शेकडो वर्षे चालली. या मिश्र तऱ्हेत कान, तोंड, डोळे व हात अशा चार साधनांचा उपयोग करावा लागे. ही तऱ्हा उजेडात बरीच कामास पडे. परंतु आंधारात ही फारच लुली व तोकडी भासे. ज्यांना ध्वनी नाही त्या पदार्थाचे व क्रियांचे प्रदर्शन कसे करावयाचे ऊर्फ त्यांना नावे कशी द्यावयाची ही अडचण विचारप्रदर्शनाच्या प्रगतीत अत्यंत संकटाची होती व ती काढून टाकण्याला मनुष्याला फार कालवधी लागला असावा. कालान्तराने कोण्या कल्पकाला सध्वनी पदार्थांना व क्रियांना अध्वनी पदार्थांच्या व क्रियांच्या आधाराने नावे देण्याची युक्ती सुचली. दाह किंवा उकाडा झाला असता मराठीत हुष्, हुष् असा उद्गार काढीत. हाच दाहार्थक उद्गार पाणिनीने आपल्या धातुपाठात 'उष् दाहे' म्हणून दिला आहे.

या दाहार्थक उष् उद्‌गारावरून जळजळीत वाळूमधून उन्हाच्या तडाक्यात मनुष्याला वाहून नेण्याऱ्या प्राण्याला उष्ट्र म्हणून शब्द निर्माण झाला. उष् म्हणजे दाह, त्यातून तारून नेणारा तो उष्ट्र. दाह करणाऱ्या वनस्पतिरहित ओसाड जागेला उषर व दाहाचा प्रतिकार करणाऱ्या डोक्यावरील आच्छादनाला उष्णीष नाव पडले. त्या प्राणाच्या आवाजावरून उष्ट्र हे नाव पडलेले नाही, सबब असा तर्क करता येतो की, आर्यांच्या अत्यंत प्राथमिक मूलस्थानात उष्ट्र प्राणी नव्हता. या उद्‌गारावरून प्रभातवाचक उषा, संध्यारागवाचक उषस् व ऊनवाचक उष्ण हे तीन अध्वनी शब्द अस्तित्वात आले. उषा, उषस्, उष्ण इत्यादी शब्दात जे प्रत्यय संस्कृतभाषा बोलणारे लावीत ते प्रत्यय संस्कृतभाषा बोलणाऱ्यांचे हजारो वर्षापलीकडील पूर्वज लावीत नव्हते. प्रत्ययांऐवजी ते प्रत्ययार्थक सबंध शब्दच योजीत. आस्ते आस्ते प्रत्ययार्थक सबंद शब्दांचे संक्षेप होता होता साक्षात् प्रत्यय निर्माण झाले. परंतु सप्रत्यय भाषेचा काल फार अलीकडील आहे. सध्या ज्या हजारो, किंबहुना लाखो वर्षांपलीकडील भाषेसंबंधी बोलणे चालले आहे तो काल अप्रत्यय भाषेचा होता. प्राणी व वस्तू यांच्या ध्वनींच्या अनुकरणात्मक शब्दांनी बनलेल्या त्या लाखो वर्षांपूर्वील प्राथमिक अप्रत्यय भाषेचा वैदिक किंवा संस्कृत भाषा कदाचित् पंचवीस-तिसावा अपभ्रंश असण्याचा यद्यपि पूर्ण संभव आहे, तत्रापि त्या ध्वन्यनुकारक अप्रत्यय प्राथमिक भाषेचा मागमूस अद्यापही संस्कृत भाषेत बराच राहिलेला आहे. हा मागमूस पाणिनीने दाखवून दिलेला आहे. धन्य आहे याच्या पृथक्करणशैलीची की बहुतेक सर्व संस्कृत शब्दांची धातुबीजे प्रत्ययोपसर्गांची टरफले सोलून काढून त्याने धुतल्या तांदुळाप्रमाणे मोकळी करून ठेविली आहेत. पाणिनीय धातुकोशांतील धातू व इतर धातू यांची परीक्षा करता आम्हास असे आढळून आले आहे की सुमारे सातशे धातू ध्वन्यनुकरणोत्पन्न आहेत. कित्येक एकध्वन्यात्मक आहेत व कित्येक अनेक ध्वनींच्या संयोगापासून झालेले आहेत. याशिवाय बोलण्याच्या भाषेत चिमचिम, गपगप, फसफस, धपधप, इत्यादी ध्वन्यनुकारक धातू पाणिनीने व कोशकारांनी जे दिलेले नाहीत, परंतु संस्कृत ग्रंथातून वारंवार जे भेटतात व जे केवळ बोलण्यात होते असे मराठीतील त्यांच्या अपभ्रंशांवरून अनुमानता येते ते हजारो निराळेच. तात्पर्य, लाखो वर्षापूर्वील आर्यपूर्वज प्राथमिक मनुष्याला किंवा मनुष्यसमाजाला हजारो ध्वन्यनुकारक शब्दांची भाषा अवगत होती आणि अशी स्थिती असणे काही विचित्र नाही. मुळी बोलणे म्हणजे विकार, विचार, वस्तू व क्रिया यांचे प्रदर्शन मुखातील ध्वनींनी करणे. जो जो म्हणून काही अनुभव आला त्याचे प्रदर्शन मुखध्वनीने करण्याच्या या कलेचे सारसर्वस्व म्हणजे सर्व ब्रह्मांड ध्वनिरूप करून दाखवावयाचे. कोणत्या प्राथमिक समाजाने ब्रह्मांडाचा कितवा भाग कोणत्यातऱ्हेने ध्वनिमय केला असेल हे त्या त्या समाजाच्या बहिःसृष्ट्यनुभवावर व प्रतिभेवर अवलंबून राहणार हे उघड आहे. सध्या आपल्या भोवतील प्राण्यांचे व पदार्थांचे आवाज आपण ऐकतो त्याहून भिन्न असे आवाज लाखो वर्षापूर्वील प्राथमिक मनुष्यसमाजाने ऐकिले असतील हे सांगावयास नको. तत्कालीन दोन सोडांचे हत्ती

किंवा पन्नास हात लांबीच्या सुसरी कोणता ध्वनी करीत असतील अगर तत्कालीन नद्या, झाडे कोणत्या आवाज करीत असतील त्याची सध्या आपणास कल्पनाही नाही. आपणास सध्या अज्ञात असलेल्या त्या ध्वनींवरून प्राथमिक मनुष्यांनी जे शब्द बनविले ते शब्द प्राथमिक ध्वन्यनुकरणात्मक नसून सादृश्यावरून बनविलेले साधित म्हणून ठरविण्याची चुकीही आपल्या हातून होण्यासारखी आहे. येथे ऐतिहासिक प्रमाण उपलभ्य नाही. ते लाखो वर्षापूर्वीचे ध्वनी पुनरूज्जीवित करण्याचे साधन आपणाजवळ नाही. त्यामुळे मूळ शब्द कोणते व कृतक शब्द कोणते ते निवडता येणे परम दुर्घट आहे. उदाहरणार्थ, काळा, पांढरा, हिरवा वगैरे रंगवाचक शब्द घ्या. या निर्जीव पदार्थांना नावे कशी मिळाली, सादृश्यावरून मिळाली की ध्वनींवरून मिळाली? काळा, पांढरा हे जे साधे नित्य भेटणारे रंग आहेत त्यांची नावे प्राथमिक मनुष्याला निर्माण करण्याची आवश्यकता जरूर भासली असेल. त्याशिवाय अत्यंत साधाही व्यवहार शक्य नाही. आमच्या मते काळा, पांढरा ही रंगनामे खालील तऱ्हेने अस्तित्वात आली असावीत. अत्यंत कृष्णवर्ण अशा एखाद्या तत्कालीन प्राण्याचा आवाज काल् काल् असा असावा व काळा रंग शब्दाने दर्शविण्यास प्राथमिक मनुष्याने काल काल ध्वनी करणाऱ्या त्या काळ्याकुट्ट प्राण्याचा काल काल ध्वनी अनुकरला असावा. ध्वनीच्या आधारावर तो ध्वनी करणाऱ्या प्राण्याचा जसा बोध करून देण्याचा शोध मनुष्याने लावला, त्याचप्रमाणे तो ध्वनी करणाऱ्या प्राण्याच्या रंगावरून काळा, पांढरा इत्यादी अध्वनी साध्या रंगांनाही नावे देण्याचा शोध त्याने केला. गुणींच्या ध्वनींवरून गुणांना नावे देण्याचा हा मनुष्यप्राण्याला लागलेला आणि एक अपूर्व शोध होय. आतापर्यंत ध्वनी करणाऱ्या प्राण्यांना, वस्तूंना व क्रियांनाच तेवढी नावे देण्याची कला माहीत होती. यापुढे अध्वनी गुणांचेही शब्दाने प्रदर्शन करण्याची कला त्याला माहीत झाली. भा भा ध्वनी करणाऱ्या उज्ज्वल व लखलखीत रंगाच्या पशुपक्ष्यांवरून प्रकाशाला भा हा शब्द मनुष्य लावू लागला. चोचीने, सोंडेने, पायाने किंवा दातांनी पदार्थ कराकरा फाडण्याच्या किंवा खाण्याच्या ध्वनीवरून कर हा शब्द सोंडेला किंवा चोचीला किंवा स्वतःच्या हाताला लावण्याची बुद्धी मनुष्याला झाली. कृ करणे व कृ विदारणे हे दोन धातू निर्माण झाले. येणेप्रमाणे गुणांचे शब्दांनी प्रदर्शन करण्याची युक्ती सापडल्यापासून मनुष्याने शब्दांची केवळ टांकसाळ मांडली. द्रव्य, कर्म व गुण यांचे दर्शक शेकडो शब्द मनुष्यापाशी साठले. तेव्हा त्यातील जाती ओळखण्याचा म्हणजेच व्यक्ती ओळखण्याचा आणिक एक शोध त्याला लागला. हिरवा, पांढरा, तांबडा, काळा इत्यादी अनेक वर्ण पाहून त्या सर्वांना सामान्य असा रंग हा शब्द त्याने मुकरर केला. रज् हा मूळ लालभडक रंगाचा द्योतक शब्द होता. त्या शब्दाला सामान्यार्थक बनवून रंग हे जातिनाम मनुष्याने उत्पन्न केले आणि अशी अनेक जातिनामे तयार केली. नंतर महत्कालान्तराने शास्त्रीय ज्ञानाचा अहंकार झाल्यावर जाती अगोदर की व्यक्ती अगोदर हा वाद तो घालू लागला. जाती कल्पना मनुष्याच्या डोक्यात स्वयंभू आहे आणि भूतभविष्यवर्तमान सर्व व्यक्तींना व्यापून जाती असते, असा

निरर्गल सिद्धान्तही तो ठोकून देऊ लागला. वस्तुतः जातिनामे भाषेच्या व बोलण्याच्या सोयीकरता केवळ सांकेतिक आहेत व त्या नामांनी दर्शविलेला अर्थ मूर्त नसून केवळ मानसिक असतो हे त्याच्या लक्षात पर्वापर्वापर्यंत येईना. जातींचा मानसिक अर्थही जसजशी माहिती वाढत जाते तसतसा बदलत जातो व कधी कधी नष्ट होतो, सबब जातिकल्पना स्वयंभू, स्थिर व व्यक्तिप्राक् नाही, हेही तो ध्यानी धरीना. हा जातिव्यक्तिवादाचा घोटाळा पुढला आहे; परंतु त्याचा उगम प्राथमिक मनुष्य समाजात लाखो वर्षापूर्वीच झालेला असल्यामुळे प्रस्तुत स्थली उल्लेख झाला. पुढे जरी असा हा घोटाळा जातिनामांनी केला, तत्रापि भाषेच्या व विचाराच्या प्रगतीला, गतीला जातिनामे जशी सध्या तशीच किंवा त्याहूनही जास्त पुरातनकाली उपकारक झाली. या पुरातनकाली मराठीभाषेची पूर्वज जी वैदिकभाषा तिची पंचवीस-तिसावी पूर्वज जी प्राथमिक अप्रत्यय भाषा ही निव्वळ सुट्या ध्वनींची होती. सार्थ ध्वनी एकापुढे एक काढणे हीच तत्कालीन भाषणशैली. नदीच्या काठावरील सिंहानी मनुष्य मारिला, हा आशय-नदी कंठ स्थान सिंह मनुष्य झोप - हे शब्द एकापुढे एक उच्चारून कसातरी अर्धामुर्धा दर्शविला जात असे व बाकी राहिलेला अर्थ अंगविक्षेपांनी पूर्ण केला जाई. अनेकवचन बोटांनी किंवा हातांनी दाखविले जाई. अध्वनिपदार्थवाचक शब्द व जातिवाचकनामे अस्तित्वात आल्यावर कालदर्शक व संख्यादर्शक शब्द अस्तित्वात आले. नंतर लिंगभेद समजू लगला. शेवटी वाढ होत वारंवार येणाऱ्या संबंधदर्शक शब्दाचे संक्षेप होऊन प्रत्ययोपसर्गादींची निर्मिती झाली आणि लाखो वर्षांनी वैदिक भाषा जीस म्हणतात ती उत्क्रांती झाली. तिच्यापासून किंवा तिच्या बहिणीपासून जुनी महाराष्ट्री, महाराष्ट्री, अपभ्रंश व जुनी मराठी अशा परंपरेने आपण सध्या बोलतो ती अर्वाचीन मराठी उदयास आली. प्राथमिक, वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, मराठी या भाषांची म्हणजे मुखध्वनींनी विचारप्रदर्शन करणाऱ्या साधनांची परंपरा ही अशी आहे.

४. ही परंपरा वैदिक आर्यांची झाली. पृथ्वीवर इतर अशाच पाच सात ध्वनिपरंपरा आहेत. असुर भाषा, द्रविड भाषा, चिनी भाषा, अमेरिकन इंडियनांच्या भाषा, आफ्रिकन भाषा इत्यादी. विचारप्रदर्शनाची ध्वनिसाधने अनेक झाली आहेत आणि त्यांचे ध्वनी आर्यध्वनीहून भिन्न आहेत. भिन्नध्वनी असण्याचे कारण प्राथमिक अवस्थेत त्या त्या लोकांच्या कानावर आर्यांना भेटले त्यांहून इतर प्राण्यांचे व वस्तूंचे भिन्न ध्वनी पडले हे होय. या आर्येतर लोकांच्या ध्वनिसाधनांचा विचार इथे इतकाच स्पर्शून, आर्यांच्या दुसऱ्या एका विचारप्रदर्शक साधनाकडे वळू.

५. मुखध्वनींनी विचारप्रदर्शन करावयाचे म्हटले म्हणजे ऐकणारी व्यक्ती बोलणाऱ्या व्यक्तीच्या आटोक्यात हजर असावी लागते. व्यक्ती गैरहजर असली तर या ध्वनिसाधनाचा काहीएक उपयोग होत नाही. ध्वनी धरून ठेवून गैरहजर इसम त्यास्थानी आला असता तो त्याच्या कानावर पडावा, ही युक्ती त्या प्राथमिक अवस्थेत असंभाव्य होती. तत्रापि प्राथमिक अवस्थेत त्यातल्यात्यात मनुष्याला एक युक्ती सुचलीच. तो ज्या स्थळी रहात असे - प्रायः

डोंगरकपारी किंवा गुहा - तेथील भित्तिसदृश्य खडकावर किंवा खाल्लेल्या अथवा मारलेल्या प्राण्याच्या हाडावर आपल्या अवस्थेचे रेखाचित्र तो कोरी, व त्या चित्रद्वारा आपले मनोगत आप्तेष्टांना कधीकाळी तरी कळेल अशी आशा बाळगी. या कोरकामाप्रमाणे रंगचित्राचेही काम प्राथमिक मनुष्याला माहीत होते, असे विंध्यपर्वतातील अवशेषांवरून उघड होते. गैरहजर मनुष्याकरताच तेवढे कोरकाम किंवा रंगचित्र प्राथमिक मनुष्य काढी असे नव्हे. जेथे भाषेने संपूर्ण मनोगत शब्दद्वारा कळविता येत नसे, तेथे हजर मनुष्यांना काठीने किंवा बोटाने जमिनीवर रेघा व पाने, भूर्जपत्रे इत्यादींवर रंगचित्रे काढून तो आपले मनोगत स्पष्ट करी. रंगचित्र व कोरीव रेखाचित्रे यांचा प्राथमिक मनुष्य शब्दांच्या बरोबरीने उपयोग करीत असावा असा बळकट अंदाज आहे. प्राथमिक मनुष्याचे जे रेखाकर्म किंवा रंगचित्रकर्म हिंदुस्थानात सापडते त्याचा संबंध आपणा वैदिक लोकांच्या पूर्वजांशी नाही. कारण आपण या देशातील मौल नव्हो. तथापि, आपणा आर्यांचे मूलस्थान हिंदुस्थानाबाहेर जेथे कोठे असेल तेथे आपल्या प्राथमिक पूर्वजांनी कोरीव व रंगीत चित्रे विचारप्रदर्शनार्थ काढली असतील यात बिलकूल संशय नाही. ध्वनी ऊर्फ भाषा जशी मनुष्याला उपजत आहे तसेच कोरकाम व रंगचित्रकर्म ही दोन्ही मनुष्याला स्वयंभू आहेत. तत्रापि, आपणा आर्यांचा संबंध हिंदुस्थानातील प्राथमिक कोरीव व रंगीत चित्रकर्माशी दुसऱ्या एका बाजूने पोहोचतो. वैदिक आर्यांच्या पूर्वी या देशात नागलोक रहात असत. ते जर येथील मौल असतील तर प्राथमिक अवस्थेतील त्यांचे हे चित्रकर्म असू शकेल. नागलोकांची चित्रकर्माबद्दल ख्याती असे. यांचा शरीरसंबंध वैदिक आर्यांशी झालेला इतिहासातसिद्ध आहे व नागवंशाचा अंतर्भाव आर्यवंशात करण्याची रूढीहि आहे. कसेही असो, कोरीव किंवा रंगीत चित्रकर्माने मनोगत व्यक्त करण्याची कला ध्वनीनी मनोगत व्यक्त करण्याच्या कलेइतकीच बहुतेक प्राथमिक आहे. प्राथमिक अवस्थेत चित्रीकरणाचे हे साधन सामान्य रोजचे विचार प्रगट करण्याच्या उपयोगी पडे. प्राथमिक अवस्थेत या स्वयंभू चित्रसाधनांचा अवलंब विचारप्रकटनार्थ केल्यावाचून आर्य राहिले असतील हे संभवत नाही.

६. शब्दसाधनाला फक्त तोंड व कान ही दोन इंद्रिये लागतात. चित्रसाधनाला हात व डोळे ही दोन इंद्रिये लागून शिवाय एखादा चित्रक्षम बाह्य पदार्थ लागतो. शब्दसाधन अंधारात व उजेडात सारखेच उपयोगी पडते, परंतु गैरहजर माणसाला निरुपयोगी असते. जूण काय, चित्रसाधन गैरहजर माणसाच्याच करिता प्राथमिक मनुष्याने निर्माण केले. पाहिल्या वस्तूचा कालान्तराने स्वतःला किंवा इतरांना पुनः पुनः अनुभव आणून देण्यास चित्रकलेचे हे साधन प्राथमिक मनुष्याला फारच साहाय्यक झाले असावे. इतके की चित्राने तो निरोपही पाठवीत असावा. या कलेचा जसाजसा जास्त अनुभव येत चालला तसतसा त्यात सुधारणा होत गेल्या. फळ्यावर किंवा भूर्जपत्रांवर महत्त्वाच्या प्रसंगांची किंवा वीरांची चित्रे काढून ती गोत्रांतील आसपास जवळ दूर राहणाऱ्या मनुष्यास दाखवीत हिंडणारे वक्ते उत्पन्न झाले व चित्रांच्या अनुषंगाने रसभरित कथा करू लागले. आपल्याकडे निरक्षर लोकांत चित्रकथी हा

धंदा अद्यापही करतात. ही चित्रकथकांची संस्था अत्यंत जुनी की, वेदादिग्रंथ तिच्या मानाने अत्यंत अर्वाचीन समजावे लागतात. ऋग्वेदात चित्र शब्द येतो व त्याचा अर्थ आश्चर्यवत् पाहणे असा करतात. धातुपाठाकार चित्रीकरण व कदाचित् दर्शन असे दोन अर्थ चित्र धातूचे देतो. ऐतिहासिकदृष्ट्या पाहाता चित्रीकरण हा अर्थ जुना धरावा असे मत होणे रास्त आहे. चित् हा प्राथमिक अवस्थेतील अत्यंत जुना धातू. त्यापासून संज्ञा ज्या वस्तूची झाली ती वस्तू बाह्यपदार्थांवर रेखाटणे या क्रियेला चित्र हा शब्द लावू लागले. मन् विचार करणे यापासून दुसऱ्याच्या हृत्पटावर तो विचार काढणे याला मंत्र हा शब्द किंवा तन् पसरणे पासून दुसऱ्यावर हुकमत पसरणे या अर्थी तंत्र हा शब्द, याच मासल्याचे आहेत. चित्र, मंत्र, तंत्र हे शब्द चित्, मन्, तन् या शब्दांहून अर्वाचीन. येणेप्रमाणे चित्रीकरणाची ही कला वैदिक लोकांच्या पूर्वजांत अति जुनी आहे व विचार प्रगट करण्याचे एक साधन म्हणून मुख्यतः ती प्रथम अस्तित्वात आली. शब्दसाधन व चित्रसाधन यांमध्ये दुसरा फरक असा आहे की, ध्वनीचे अनुकरण शब्दसाधन करते व आकृतीचे अनुकरण चित्र करते. आकृती जशी दिसते तशी मनुष्य डोळ्याने ग्रहण करतो. सृष्टीत आकृत्या बहुत मिश्र असतात, साध्या नसतात. तळ्यावरील झाडावर हातात दगड घेऊन उभ्या राहिलेल्या माकडाने चोंचीत सर्प धरणारी घार मारिली, ही सर्व मिश्र अवस्था माणूस एकदम पहातो व तिचे मिश्र चित्र प्रथमतः काढतो. नंतर बहुत कालान्तराने मिश्र अवस्थेतील एक एक बाब तो पृथक्करावयाला शिकतो. प्रथम मिश्र व नंतर साधे, ही परंपरा चित्रीकरणात जशी दिसते तशी ध्वनीकरणातही दिसते. पशुपक्ष्यादी प्राणी एकेक सुटा ध्वनी करीत नाहीत, अनेक ध्वनी सवलित ध्वनिपरंपरा करतात. ही ध्वनिपरंपरा मनुष्याच्या कानावर पडते व तिचे अनुकरण ध्वनिपरंपरेने मुखद्वारा साधण्याचा प्रयत्न तो प्रथम करतो आणि नंतर त्या मिश्र ध्वनिपरंपरेतील एखाद्या सुट्या ध्वनीची अनुकरणार्थ निवड करतो. मिश्रातून सुट्याचा उदय होण्याला किती कालावधी लागला असेल त्याची कल्पनाच करावी. मिश्र चित्रांतून सुट्या चित्रावर यावयाचा काल व मिश्र ध्वनीतून सुट्या ध्वनींच्या अनुकरणावर यावयाचा काल एक होय. मिश्र ध्वनीवरून व मिश्र चित्रावरून सुट्या ध्वनीवर व सुट्या चित्रावर येण्याच्या यातना भोगताना, प्राथमिक मनुष्य फारच गडबडला, गोंधळला, घुटमळला व भांबावला असेल. स्पानिश घोडेस्वार पाहून घोडे आणि स्वार या दोन वस्तू एकच असाव्या हा जसा गोंधळ अमेरिकन इंडियनांचा प्रथमदर्शनी झाला व नंतर कालान्तराने घोड्याचे स्वारापासून त्यांनी पृथ्थकरण केले, किंवा पाण्याचा थेंब पाहून तो अविभाज्य द्रव्य असावा अशी भ्रामक समजूत अनेक युगे चालून नंतर हैड्रोजन व ऑक्सिजन या दोन द्रव्यांत त्याचे रसज्ञांनी पृथक्करण जसे नुक्ते पर्वा केले आणि हे पृथक्करण झाल्यावर जो हिरमुसलेपणा, आचंबा व हर्ष इडियनांना व रसज्ञांना झाला तोच हिरमुसलेपणा, आचंबा व हर्ष मिश्र चित्रावरून व मिश्र ध्वनीवरून सुट्या चित्रावर व सुट्या ध्वनीवर येताना प्राथमिक मनुष्याला झाला.

७. सुट्या ध्वनिसाधनाने तीन बाबींचा बोध होतो - १. बाह्य वस्तू, २. त्या वस्तूची

मनातील कल्पना आणि ३. बाह्य वस्तू व व आंतरकल्पना यांचा दर्शक स्वतः शब्द. प्राथमिक मनुष्य चित्राने प्रथम बाह्य वस्तू दाखवू लागला. मग त्या वस्तूला नाव म्हणजे शब्द म्हणजे ध्वनी त्याने दिला असो किंवा नसो. कालांतराने त्याच्या असे लक्षात आले की चित्र जी वस्तू दर्शविते त्या वस्तूचा दर्शक जो ध्वनी या ध्वनीचेही दर्शक चित्र होऊ शकेल. येथपासून चित्रध्वनीचे म्हणजे वस्तुदर्शक शब्दाचे दर्शक झाले. घोड्याचे चित्र घोडा या वस्तूचे जसे दर्शक तसेच घोडा या शब्दाचे दर्शक झाले. पुढे असे सुचले की, घोड्याचा सबंध सगळा आकार काढण्यापेक्षा घोड्याचा नुसता मुखवटा काढला तरी तेवढा मुखवटाच घोडा शब्दाचा दर्शक होऊ शकेल. या युक्तीने चित्रांनी शब्द दर्शविण्याला उगडच जास्त सोयीचे झाले. चित्रलेखनाने वस्तूही ध्यानात येई. चित्रलेखनांत शब्दांचे समास देखील दाखविता येत. तडागांदर्गतमच्छः या शब्दसमासाचा किंवा कल्पनासमासाचा चित्रसमास तळ्याच्या चित्रात माशाचे चित्र काढून दाखविला जाई. येणेप्रमाणे चित्रलेखनाची कला अस्तित्वात आली.

८. परंतु ही कला कालान्तराने फार अवजड झाली. जेवढ्या म्हणून वस्तू व कला मनुष्याला अवगत होत्या त्या हजारो वस्तूंची कल्पनांची हजारो चित्रे काढावीत व त्याचे अर्थ ध्यानात ठेवावे लागत. शिवाय निरनिराळे कलावंत एकाच वस्तूची निरनिराळी चित्रे काढू न घोटाळा माजवीत असतील तो निराळाच. संबंध प्राणी काढण्याचे सोडून दिले, तरी प्राण्यांच्या मुंडक्यांची, कानांची, खुरांची, चोचींची व शेपटांची चित्रे काढणे आणि हसणे, लाजणे, खाणे, पळणे इत्यादी वस्तूंची चित्रे काढणे फार बेताल भासू लागले. या भानगडीतूनही कल्पक मनुष्याने मार्ग काढला. साक्षात् मुंडकी, कान काढण्याऐवजी उभ्या, आडव्या, तिरप्या, वाकड्या, वक्र, खाली, वर, पुढे व मागे रेघा काढून वस्तू व शब्द दाखविण्याची युक्ती निघाली. रेघोट्यांत आकृतीचा चित्रपणा व वस्तुदर्शनत्व सहजच मागे पडत चालले व त्या फक्त शब्दांच्या व तद्द्वारा वस्तूंच्या बोधक झाल्या. रेघोट्या शब्द दाखवीत, त्यामुळे त्यांची संख्या शेकडोंनी मोजावी लागे. शब्द फोडून त्यातील निरनिराळे अवयव विवक्षित रेघांनी दर्शविण्याची क्लृप्ती ही यापुढील पायरी होय. तत्रापि हजार पांचशे खुणा ध्यानात ठेवाव्या लागतच. शेवटी शब्दावयव ज्या साध्या ध्वनीचे बनलेले असतात त्या साध्या ध्वनीच्या दर्शक अशा खुणा अस्तित्वात आल्या म्हणजे मातृका म्हणून ज्यास संस्कृत शब्द आहे त्याचा शोध झाला. या मातृकांना म्हणजे मोजक्या विवक्षित खुणांना संस्कृतात अक्षरे म्हणजे न बदलणाऱ्या कायमच्या खुणा असे अन्वर्थक नाव पडले. मूलाक्षरांचा शोध हा असा पायरी पायरीने व बहुत प्रयासाने लागलेला आहे, एकदम नव्याने कोणी निर्माण केला असा अर्थ नाही. मूलाक्षरे ही अगदी साध्या अत्यंत पृथक्कृत ध्वनींची तेवढी दर्शक आहेत, वस्तू कल्पना किंवा शब्द यांची दर्शक नाहीत. चित्रावरून अक्षरापर्यंत येता येता, वस्तू व कल्पना यांना अजिबात काट मिळून फक्त साधा पृथक्त ध्वनी तेवढा राहिला.

९. अक्षरसंस्थानाचा हा असा समान्माय म्हणजे परंपरा आहे. १. संबंध प्रसंगाचे मिश्र

चित्र, २. सुटे चित्र, ३. चित्राचा भाग, ४. सरळ रेषा, ५. वक्र रेषा, ६. शब्ददर्शक रेघा, ७. शब्दावयवदर्शक रेषा व ८. साध्या मूळध्वनींच्या सरळवक्र रेखामय खुणा ऊर्फ मूळाक्षरे, अशी लांब परंपरा आहे. चित्रणे व लिहिणे यांची प्रसिद्ध झाल्यावाचून मूळाक्षरांची सिद्धी नाही. मूळाक्षरांच्या पूर्वी चित्र काढणे व रेघा काढणे या क्रियांचे ज्ञान मनुष्याला अवश्य आहे. अर्थात् ज्यांना मूळाक्षरे माहीत आहेत ते लोक स्वतः तरी किंवा ज्यांच्यापासून त्यांनी मूळाक्षरे उसनी घेतली ते लोक लिहिण्याच्या टप्प्यावरून दूर गेले असले पाहिजेत. वर उल्लेखिलेल्या आठ पायऱ्या चढल्याशिवाय मिश्र ध्वनींचे मूळ ध्वनींत पृथक्करण करता येणे संभाव्य सुद्धा नाही, मग शक्य कोठून असेल? सुलभ व सोईस्कर मूळाक्षरांच्या शोधावर येत असताना व आल्यावर नंतर मूलध्वनींचे पृथक्करण मनुष्याला शक्य झाले. वैदिक आर्यांनी ज्याकाळी अक्षरांचा शोध केला त्याकाळी अक्षरांना ते वर्ण या संज्ञेनेही ओळखीत. वर्ण व अक्षर हे दोन शब्द शकपूर्व १००० च्या सुमारास झालेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायीत गृहीत धरलेले आहेत. वर्ण म्हणजे रंगाने काढलेली ध्वनीची खूण व अक्षर म्हणजे ध्वनीची न बदलणारी खूण. ऱ्हस्व लघु व दीर्घच, या दोन सूत्रात ऱ्हस्व या नपुसकलिंगी रूपापुढे उच्चार हा पुल्लिंगी शब्द अध्याहृत समजता येत नाही. अक्षर किंवा वर्ण हे दोन नपुसकलिंगी शब्दच अध्याहरणे भाग पडते. अक्षर व वर्ण यांच्यात भेद असा आहे की लोखंडी शलाकेने फळा, पाटी, दगड वगैरे कठिण भूमीवर खोदून जी आकृती निघते तिला अक्षर म्हणत व भूर्जपत्रादी मऊ भूमीवर रंगाने काढलेल्या आकृतीस वर्ण म्हणत. शलाकादी कठिण पदार्थांनी दगडावर रेखाचित्र व रंगांनी रंगचित्रे काढण्याची कला अत्यंत प्राथमिक मनुष्याला माहीत होती, हे सुप्रसिद्ध आहे. तेव्हा पाणिनीकालीन आर्यांना या लेखनाच्या दोन्ही तऱ्हा माहीत होत्या हे सांगणे नको. इतकेच नव्हे तर रेघांच्या खुणांनी संख्यादर्शक ध्वनी दर्शविण्याची कला ऋग्वेदकालीच माहीत होती, हे पंचकर्ण्यः व अष्टकर्णः या रुपांवरून सर्वमान्य आहे. सबब, अरेमियन लोकांपासून अक्षरे हिंदूंनी उसनी घेतली असावी इत्यादी तर्क संयुक्तिक दिसत नाहीत. उलट अरेमियन लोकांनी आर्यांच्यापासून अक्षरे काढण्याची व अक्षरसाम्नायाची कला उचलली असावी, असे दिसते. शकपूर्व चौदाव्या शतकात आर्याचा अंमल मितानी देशावर असण्याच्या सुमारास अरेमियन लोकांनी आर्य अक्षरसम्नाय बहुशः घेतला असावा आणि तोही मोडून तोडून अर्धाकच्चा केला असावा. मूलस्थानातून हिंदुस्थानात येऊन राहिल्यामुळे, मूलस्थानात भौगर्भिक अदलाबदल झाल्यामुळे व मधील टापूत अद्याप शोध व्हावयाचा असल्यामुळे आर्यांच्या रेखाचित्रांचा व रंगचित्रांचा वगैरे पत्ता लागलेला नाही. तत्रापि पाणिनीपूर्वी आर्यांनी वर्णसमाम्नाय शोधून काढलेला होता यात बिलकूल संशय नाही. हीच पाणिनीकालीन वर्णमाला अपभ्रंश होत होत महाराष्ट्रात बालबोध या संज्ञेने प्रचलित आहे.

१०. विचारप्रदर्शनार्थ साधन म्हणून ध्वनीपासून मनुष्याने एका पाठीमागून एकएक शोध

करून महत्कालान्तराने भाषा निर्माण केली व चित्रांपासून अक्षरे निर्माण केली. या दोन सृष्ट्या उत्पन्न करण्याच्या प्रारंभाच्याही पूर्वी तिसऱ्या एका साधनाचा मनुष्याने उपक्रम केला. ते साधन हावभाव ऊर्फ विक्षेप हे होय. या साधनाचा प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी उल्लेख केला आहे. या साधनाची प्राथमिक मनुष्यात जी स्थिती होती तीच स्थिती सध्याही आहे. भाषा व अक्षरे यांच्या अवाढव्य प्रगतीमुळे विचारप्रदर्शन व व्यवहार करण्याच्या कामी हे साधन सुधारण्याची आवश्यकता नव्हती आणि भाषा व अक्षरे यांच्या अभावी आवश्यकता असती. तत्रापि भाषा व अक्षरे जे ब्रह्मांड काम करतात ते करण्याची या साधनाची क्षमताही नाही. तथापि बोलण्याला पोषक दुजोरा म्हणून याची विचारप्रदर्शनाच्या कामी ज्यांना भाषा कळत नाही त्या पशुपक्ष्याशी व्यवहार करण्याच्या कामी व भाषा आणि अक्षरे यांनी जे विचार व विकार प्रदर्शित करता येणे मुष्कील आहे ते विचारविकार दाखविण्याच्या कामी, या साधनाचा मनुष्यप्राणी अतिशय उपयोग करीत आलेला आहे व त्यास त्याने व्यवहारक्षमताही आणलेली आहे. नैसर्गिक हावबावाचे परिणत व कृत्रिम रूप म्हटले म्हणजे ज्यास अभिनय म्हणतात तो होय. अनुकरणात्मक ध्वनीचे भाषा हे जसे परिणत व कृत्रिम रूप किंवा अनुकरणात्मक रेघांचे अक्षर हे जसे परिणत व कृत्रिम रूप, तसेच अनुकरणात्मक सजर विक्षेपाचते अभिनय हे परिणत व कृत्रिम रूप आहे.

११. ध्वनी, रेघा व हावभाव या तीन साधनाइतकेच जुने एक चौथे साधन प्राथमिक मनुष्याला अनुकरणाने सुचले. ते हे की, पाहिलेल्या वस्तूची हुबेहुब आकृती बनविणे. रेघांचे साधन लांबी व रुंदी या दोन परिमाणांतून कार्य करते. हुबेहुब आकृतीच्या साधनाला लांबी व रुंदी लागून शिवाय आणिक खोलीही लागते. प्रथम प्रथम या आकृती तो लाकडाच्या, मातीच्या किंवा दगडाच्या बनवी. राही त्या कपारीचे किंवा गुहेचे अनुकरण करून दोन उभ्या दगडांवर तिसरा एक दगड ठेवणे किंवा राही त्या झाडावरील माच्याचे अनुकरण करून पाण्यात माचे बांधणे, नदीतील रांजण पाहून त्यासारखे लहानमोठे रांजण व रांजण्या करणे, बेलफळे, नारळ इत्यादींच्या कवट्याप्रमाणे मातीची भांडी करणे, गुहेतील पाण्याच्या थिबकण्याने बनलेल्या स्तंभाप्रमाणे दगडाचे स्तंभ बनविणे, पशुपक्ष्यांच्या मृत्तिकामय, दारुमय किंवा पाषाणमय मूर्ती घडविणे, इत्यादी त्रिपरिमाणक आकृत्या बनवून त्यांची कल्पना इतर माणसांना करून देण्याचा हव्यास प्राथमिक मनुष्याला असे. याचीच परिणती होत होत जमिनीवर व पाण्यावर स्वतःच्या उपयोगाकरता नाना प्रकारची भांडी बनविण्याची कला मनुष्याने निर्माण केली. ही कला परिणतदशेस यावयाला हजारो किंबहुना लाखो वर्षे लागली, हे पुन्हा पुन्हा सांगण्याचे कारण नाही.

१२. येणेप्रमाणे १) ध्वनीपासून भाषा, २) रंगीत किंवा साध्या रेखाचित्रापासून अक्षरमालिका, ३) नैसर्गिक हावभावापासून कृत्रिम अभिनय व ४) पाहिलेल्या आकृतीपासून बनावट भांडी, अशा चार कृत्रिम व्यावहारिक कला मनुष्याने आपल्या अकलेने संपादन केल्या. शेकडो टक्केटोपणे खाऊन व हजारो प्रयोगात फसून मनुष्याला या चार नित्योपयोगी कला परमकष्टाने व निडळाच्या

घामाने साध्य झाल्या. कोण्या काल्पनिक स्वर्गात किंवा नरकात राहणाऱ्या देवासुरांनी दिल्या अशातला बिलकूल भाग नाही. शंकराच्या डमरूतून ध्वनी निघाले, चित्रलेखानामक गंधर्वकन्येने चित्रे काढण्याचे कसब शिकविले, कोण्या किन्नराने अभिनय पढविला किंवा विश्वकर्म्याने भांडी बनविण्याचा धडा घालून दिला वगैरे बोलणी केवळ भाकडकथा होत. या भाकडकथांचा अर्थ इतकाच आहे की, भाषा, अक्षरमालिका, अभिनय व भांडी निर्माण करण्याची परंपरा काय आहे याचा ऐतिहासिक उलगडा करण्याचे ज्ञान पर्वापर्वापर्यंत भारतीय मनुष्यात नव्हते. ज्या बाबींचा उगम, घटना, वृद्धी व परिणती कळत नव्हत्या त्या बाबी कोण्यातरी दैवी शक्तीच्या प्रसादाने प्राप्त झाल्या, असा अर्थ अज्ञ मनुष्य सदैव व सर्वत्र लावीत आलेला दृष्टीस पडतो. हे सर्व आपलेच स्वतःचे कर्तृत्व आहे, हा शोध मनुष्याला परम कष्टाने लागलेला आहे. आता शंकराच्या डमरूचे किंवा देवाच्या विश्वकर्म्याचे किंवा वागधिष्ठाच्या सरस्वतीचे किंवा पशुपक्ष्यांचे नामकरण करणाऱ्या नोहाचे दैवी अर्थाने काहीएक प्रयोजन उरलेले नाही. ऐतिहासिकदृष्टीने यांच्यातूनही इतिहास निघण्यासारखा आहे.

१३. ध्वनी, रेघा, हावभाव व आकृती यांना भाष अक्षर, अभिनय व भांडी यांचे रूप देऊन या चारी नैसर्गिक व अनुकारक शक्त्यांचा उपयोग रोजच्या व्यवहारातील विचारप्रदर्शनाच्या कामी मनुष्याने केला. साध्या, सरळ, पोटभरू व्यवहाराला ही भाषादी साधने साळसूदपणे पुरी पडतात, हे खरे आहे. परंतु विचारांचे किंवा विकारांचे जेव्हा काहूर उठते आणि सुखदुःखादींचा जेव्हा कल्लोळ माजतो, तेव्हा साधी बोलणी आणि सुधी लिहणी कुचकामाची ठरतात आणि तीव्रतर साधनांचा आश्रय केल्यावाचून वादळाची शांती होत नाही. विचाराचा व विकारांचा हा तीव्र आवेग दर्शविण्यास मनुष्याने अगदी अज्ञातपूर्व अशी नवीन साधने शोधून काढली असे नाही. पूर्वीचा पाया ज्याला बिलकूल नाही. असे नवीन काहीच शोधून काढणे शक्य नाही. पाया पूर्वीचाच, साधने तीच, फक्त भरदारीत फरक. साध्या बोलण्याला जो ध्वनी लागतो त्यालाच दीर्घ व भरदार करून कोणत्याही आवेगाचे प्रदर्शन तीव्रपणे करणे म्हणजेच गाणे. साध्या मूळाबरहुकूम चित्ररेखांना आवेगाचे तीव्र रूप भरदार, काल्पनिक व नाजूक रंगांनी देणे म्हणजेच चित्र काढणे. साध्या हावभावांचा अतिशय करणे म्हणजेच नाचणे आणि साध्या नित्याच्या घन आकृतींना तीव्र आवेग दाखववायास लावणे म्हणजेच मूर्ती करणे. येणेप्रमाणे ध्वनी, रेखा, हावभाव व आकृती या प्रत्येकापासून मनुष्याने साधेपणा व अतिशायन या ऐयत्तिक भेदांबर दोन दोन निरनिराळ्या कला उत्पन्न केल्या. त्यांचा नकाशा असा मांडता येईल -

| गुण | साधेपणा ऊर्फ व्यवहार | अतिशायन ऊर्फ तीव्रता |
|---|---|---|
| १. ध्वनी | भाषा | गान |
| २. रेखा | अक्षर | चित्रण |

| | | |
|---|---|---|
| ३. हावभाव | अभिनय | नृत्य |
| ४. आकृती | भांडे | मूर्तिकरण |

साधेपणाने नित्याचा अनेकविध अनंत व्यवहार होत असतो. अतिशायनाने तीव्र अनुभवाचे प्रदर्शन होते. वारंवार असे प्रसंग येतात की, रोजच्या साधेपणाचा वीट येतो व आकस्मिक तीव्र अतिशायन सर्वांनाच सदा साध्य नसते. सबब साधेपणा व अतिशायन यांचे कमी जास्त मिश्रण करून कल्पक मनुष्याने आणीक चार कला निर्माण केल्या. भाषेतील निवडक शब्द व गाण्यातील ठेकेदारपणा याच्या मिश्रणाने मनोहर काव्य ज्याला म्हणतात ते जन्मास आले. अक्षरे व चित्रण यांच्यापासून सुबोधचित्रमय ऊर्फ सचित्र ग्रंथ उदय पावले. अभिनय व नृत्य या दांपत्यापासून नाटक हे दिवटे पोर निपजले आणि भांडे व मूर्तिकरण या जोडप्याने स्तापत्य हे बडे प्रकरण जन्मविले. सगळ्यांनाच तानसेन होता येत नाही, पण स्रग्धरा किंवा मालिनी बहुतेक सर्वांना कंठारूढ करता येते. अजंटा फार थोड्यांच्या आटोक्यात असतो, पण चित्रमयजगत् इच्छा असल्यास घरोघर पाहता येते. तांडव एकट्या शंकरालाच शक्य आहे, पण ललिते आणि तमाशे गावढ्याचे मन रिझवितात. भिवा सुताराला घरोघर मजुरीला आणता येत नाही, पण एखादी जाळीदार मेहरप किंवा सुंदर वृंदावन थोड्या खर्चात कोणालाही साध्य आहे. साध्यासाध्यतेच्या व शक्याशक्यतेच्या दृष्टीने या ज्या ज्या कला निर्माण झाल्या त्यांचा नकाशा असा -

| | | |
|---|---|---|
| १. ध्वनी | { | भाषा x गान = काव्य |
| २. रेखा | { | अक्षर x चित्रण = चित्रमय ग्रंथ |
| ३. हावभाव | { | अभिनय x नृत्य = नाटक |
| ४. आकृती | { | भांडे x मूर्तिकरण = स्थापत्य |

गाणे, चित्रिणे, नाचणे व मूर्तीकरणे किंवा काव्य, सचित्रग्रंथ, नाटक व स्थापत्य या आठही कलात अंतःकरण जे मन व मनाचा मालक जो मनुष्य त्याची कर्तबगारी प्रधान असते. मनुष्याची कर्तबगारी व लुडबुड ज्यात अप्रधान असते अशाही चार बिना ध्वन्यादींच्या पायावर मनुष्याला पैदा करता आल्या. प्रायः बाह्य साधनावर विशेष मदार ठेवून या बिना मनुष्याने बनविल्या. कातडी, बांबू, धातू, केश, तारा, इत्यादींच्यावर आघात केला असता ध्वनी निघतो व तो ध्वनी योग्यतऱ्हेने वळविला तर त्याच्यापासून सुस्वर उत्पन्न होतात. बाह्य पदार्थांपासून सुस्बर काढण्याच्या

या कलेला वादन म्हणतात. वस्तूंची हाताने चित्रे काढण्यापेक्षा प्रकाशाच्याद्वारा ती काढून घेण्याची प्रकाशलेखनकला महशूर आहे. नटांची मातब्बरी सफा काढून टाकून केवळ बाहुल्यांच्याकडून अभिनय व नर्तन करविण्याची कळसूत्राची कला अत्यंत पुरातन आहे. मूर्तीच्या आंगलटीत व मुखचर्येत विचार व विकार साठविण्यापेक्षा वृक्ष, वेली, उपवने, उद्याने, मैदाने व टेकड्या यांच्या विशिष्ट रचनेने विचार व विकार चेतविण्याची भूमिरचनेची कला भरतखंडात फार जुनी आहे. वाद्यात फोनोग्राफ, चित्रणात प्रकाशलेखन व कळसूत्रात सिनेमा ही रूपे आधुनिक शास्त्र ज्ञानोत्पन्न अतएव सद्यस्क आहेत. या तिन्हीखेरीज बाकीची सर्व रूपे आपल्या या महाराष्ट्रात प्राचीन कालापासून उमद्या स्थितीत असलेली आढळतात. या बाह्य कलांचा जोड पूर्वीच्या आठ कलांना दिला असता नकाशा व परंपरा अशी बनते -

| मूळ मनुष्याधीन साधन | साधा व्यवहार | अतिशायन | व्यवहार x अतिशायन | बहिःसाधन |
|---|---|---|---|---|
| १<br>१ ध्वनी | २<br>भाषा | ३<br>गान | ४<br>काव्य | ५<br>वाद्य |
| ६<br>२ रेखण | ७<br>अक्षर | ८<br>चित्रण | ९<br>चित्रमय ग्रंथ | १०<br>प्रकाशलेखन |
| ११<br>३ हावभाव | १२<br>अभिनय | १३<br>नृत्य | १४<br>नाटक | १५<br>कळसूत्री बाहुल्या |
| १६<br>४ घनआकृती | १७<br>भांडी | १८<br>मूर्तिकरण | १९<br>स्थापत्य | २०<br>भूमिरचना |

या वीस रस्त्यांनी मनुष्य विचार व विकार प्रकट करीत असतो. पैकी १ ध्वनी, ६ रेखण, ११ हावभाव व १६ घनाकृती आणि २ भाषा, ७ अक्षर, १२ अभिनय व १७ भांडी या आठ मूळ व्यावहारिक साध्या साधनांच्या कार्यासंबंधाने मागे उल्लेख केला आहे. प्रकृत लेखात भांडे या शब्दाचा अर्थ विचारविकारप्रदर्शनार्थ किंवा व्यवहारोपयोगार्थ बनविलेली प्रतिमा, मूर्ती, घर, छपर, हौद, इत्यादी कोणतीही घन आकृती असा समजावयाचा आहे. अतिरेक होऊन विकार व विचार मनात मावेनासे झाले द्रवून ऊतू जाऊ लागले व साध्या साधनांच्या द्वारा प्रदर्शित करता येतनासे झाले म्हणजे अतिशायनाच्या ज्या ३ गान, ८ चित्रण, १३ नृत्य व १८ मूर्तिकरण या कला, त्यांचा आश्रय मनुष्य करतो. मनाचे द्रवून जे उतू जाणे त्याला रस म्हणतात. शृंगार, वीर, करूण, अद्‌भुत, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स व शांत या नऊ

तऱ्हांनी द्रवून मन उतू जाते व या नर्वाह उताचे प्रदर्शन गान, चित्रण, नृत्य व भूर्तिकरण या चार अतिशायनांनी मनुष्य साधतो. शब्द व भाषा यांचा व गानाचा काही एक संबंध नाही. गान हजारो शब्दांनी बोलत नाही. फक्त सप्त स्वरांनी नवरस बोलते. चित्रण अक्षरांनी म्हणजे बावन मातृकांनी अर्थ दाखवीत नाही. फक्त पाच रंगांच्या न्यूनाधिक्याने नवरसांचे आविष्करण करते. नृत्य म्हणजे साधे अभिनय नव्हत, अंगांच्या उद्धत हावभावांनी नवरसांचे प्रकटीकरण म्हणजे नृत्य अथवा खरे म्हणजे तांडव; आणि मूर्त्तिकरण म्हणजे केवळ भांडी घडणे नव्हे, तर घनाकृतींच्या उठावांनी नवरसांचे प्रदर्शन करणे. अतिशायनाच्या या गानादी चार कला, साध्या व्यवहाराच्या भाषादी चार कला व मूळ ध्वन्यादी चार साधने, मिळून विचारविकारप्रदर्शनाच्या बारा साधनांची कार्ये केवळ इयत्तेच्या चढउताराने बनलेली आहेत. आता तक्त्यात काव्यादी जी चार साधने मांडिली आहते ती साधेपणा व अतिशायन यांच्या मिश्रणाने अंतर्बाह्य बनलेली आढळतात. गानाचा ठेका व भाषेचे शब्द मिळून काव्यांचे गद्यपद्य बहि:स्वरूप बनते; व शब्दांचा अर्थ आणि अतिशायनोद्भूत नवरस मिळून काव्यांचे अंत:स्वरूप घडते. अक्षरे व चित्रे यांचा मिलाफ म्हणजे चित्रमय ग्रंथाचे बहि:स्वरूप व अर्थ आणि वस्तूंचे साक्षाद्दर्शन हे त्यांचे अंतःस्वरूप. अभिनयांतील हातवारे व नृत्यांतील औद्धत्य हे नाटकाचे बहि:स्वरूप व हातवाऱ्यांनी दर्शविलेले विकारविचार आणि औद्धत्यातिशायनाने दर्शविलेले नवरस हे त्याचे अंत:स्वरूप. भांडे हे स्थापत्याचे बहि:स्वरूप आणि नवरसांचा मूर्त उठाव हे अंत:स्वरूप. या चार मिश्र कलांची अत्यंत शुद्ध रूपे म्हटली म्हणजे ही. इतर नाना कलांचे मिश्रण होऊन या मूळच्या शुद्ध मिश्र कला अनेकदा मिश्र झालेल्या प्रायः पहाण्यात येतात. उदाहरणार्थ नाटक. यात गद्य, पद्य, काव्य, वाद्य, चित्र, मूर्ती इत्यादी अनेक मिश्रणे झालेली आहेत. दुसरे उदाहरण स्थापत्याचे. स्वतः फक्त एकट्या भांड्याच्या मूर्तीने नवरसांचे प्रदर्शन करणे हे स्थापत्याचे मूळ कार्य. त्यांत भिंतीवरील चित्रे, नक्षी, अक्षरे, अर्धमूर्ती, पूर्णमूर्ती, लेप, रांगोळ्या इत्यादींचे मिश्रण झालेले प्रायः आढळते. असा या बाराही कलात मनुष्याच्या कर्तृत्वाचे प्राधान्य विशेष असते. वाद्यादी ज्या चार विचार-विकार प्रदर्शनाच्या कला राहिल्या त्यात मनुष्याधीन साधनांपेक्षा बाह्य वस्तूंचे साधनाधिक्य जास्त सापडते. बाब स्पष्ट आहे, सबब या वीस साधनासंबंधी प्रपंच येथेच थांबवून, मनुष्यनिर्मित दुसऱ्या एका विचित्र साधनांचे वर्णन करतो. हे साधन पूर्ण विकारमय आहे आणि विकारमय असून आश्चर्य की, अत्यंत गूढ विचार प्रदर्शित करण्याचा हे खटाटोप करते. इतर कलांच्याप्रमाणे याही कलांचा पाया तोच आहे, म्हणजे ध्वनी, रेखण, हावभाव व घनाकृतीच आहे. फक्त पायाच्या उगमात तेवढा भेद. गानादिकलात पायाचा उगम ज्ञात असतो. वर्णयिष्यमाण कलांत नसतो. आकाशवाणी, अरण्यरुदन, पिशाचगायन, स्मशानकोलाहल वगैरे ध्वनी कित्येक मनुष्यांना कधीकधी ऐकू येतात व ते कोठून व कसे येतात ते कळत नाही. त्याने मनुष्य गांगरतो, दचकतो, हैराण होतो व कधीकधी आजारीही पडतो. या ध्वनींची बाधा दैवी समजूत त्यांचा प्रतिरोध करण्याकरिता

मनुष्य श्रुतध्वनीच्या सदृश किंवा विदृश ध्वनी तोडगे म्हणून निर्माण करतो. ऱ्हां, ऱ्हीं, ऱ्हूं, क्रां, क्रीं, क्रू, फट्, व षट्, स्वाहा, वगैरे असले असंख्यात ध्वनी तोंडावाटे काढून व इतर सार्थ किंवा अनर्थ संस्कृत, प्राकृत व धेडगुजरी शब्द किंवा शब्दमाला गुणगुणून मांत्रिक दैवीध्वनींची बाधा पिटाळून लावतात. या ध्वनींना मंत्र ही संज्ञा आहे व साधनाला मंत्रसाधन हे अभिधान आहे. अज्ञातोद्गम किंवा काल्पनिक ध्वनी जसे कित्येकांना ऐकू येतात तशीच आकाशनगरे, गंधर्वपुऱ्या, सूर्यमुखे वगैरे चित्रेही कित्येक मनुष्यांना आकाशात म्हणजे अवकाशात दिसतात. हीच काल्पनिक चित्रकला होय. कित्येक मनुष्यांच्या अंगात संचार होऊन ती नाना प्रकारचे वेडेविद्रे हावभाव, आळेपिळे दाखवितात व पिंगे घालतात. हेच काल्पनिक तांडव ऊर्फ नृत्य होय आणि कित्येक मनुष्ये भ्रांतीने पिशाच, राक्षस, खैस, वेताळ, स्वर्ग, नरक, पाताळ, देव, दानव वगैरे घनाकृती बनवितात. हेच मूर्तिकरण व स्थापत्य समजावे. अज्ञानोद्भव भ्रांतिकृत ध्वनी, रेखा, हावभाव व घनाकृती या काल्पनिक साधनचतुष्ट्याचा जोड उपरिनिर्दिष्ट ज्ञातोद्गम विश्वसनीय वास्तविक साधनांना दिला म्हणजे जो नकाशा बनतो तो असा -

## विकार-विचार प्रदर्शाची साधने

| वास्तव ऊर्फ शुद्ध | भ्रांत ऊर्फ शबल |
|---|---|
| १ ध्वनी-भाषा-गान-काव्य-वाद्य | १ ध्वनी-भाषा-गान-काव्य-वाद्य |
| २ रेखण-अक्षर-चित्रण-चित्रमयग्रंथ-प्रकाशलेखन | २ रेखण-अक्षर-चित्रण-चित्रमयग्रंथ-प्रकाशलेखन |
| ३ हावभाव-अभिनय-तांडव-नाटक-कळसूत्र | ३ हावभाव-अभिनय-नृत्य-नाटक-वेताळसभा |
| ४ घनाकृती-भांडी-मूर्ती -स्थापत्य-भूमिरचना | ४ घनाकृती-भांडी-मूर्ती-स्थापत्य-भूमिरचना |

वास्तव साधनांची उदाहरणे कोणती व भ्रांत साधनांची उदाहणे कोणती ती खालील यादीत क्रमाने देतो -

| | | | |
|---|---|---|---|
| १ वास्तव | ध्वनी | : | मानुष्य व बाह्य सृष्टीतील पदार्थांचे |
| २ भ्रांत | ध्वनी | : | अज्ञात उगमा पासून निघालेले |
| ३ वास्तव | भाषा | : | व्यवहारात बोलतात ती |
| ४ भ्रांत | भाषा | : | अज्ञातोद्भव ध्वनींच्या अनुकरणाने ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं इत्यादी मंत्रभाषा |
| ५ वास्तव | गान | : | स्वरोद्भव |
| ६ भ्रांत | गान | : | डुं डुं णे, गुणगुणणे, पुटपुटणे, इत्यादी मंत्रगान |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ वास्तव | काव्य | : | शिवाजी काव्य, नारायणवध, पोपचे डन्शियाड्, मनाचे श्लोक, इत्यादी |
| ८ भ्रांत | काव्य | : | मिल्टनचे प्यारेडाइझ लॉस्ट, डांटीची काव्ये, कुमारसंभव इ. इ. |
| ९ वास्तव | वाद्ये | : | सनया, ढोल इत्यादी |
| १० भ्रांत | वाद्ये | : | डौर (डमरू), कुडबुडे, इत्यादी |
| ११ वास्तव | रेखण | : | वस्तुदर्शक रेघा |
| १२ भ्रांत | रेखण | : | तोडग्यांच्या सरळ, वक्र व नागमोडी रेघ |
| १३ वास्तव | अक्षरे | : | अ, क, इत्यादी |
| १४ भ्रांत | अक्षरे | : | ओंकार, यंत्रे, स्वस्तिके वगैरे |
| १५ वास्तव | चित्र | : | पशुपक्षी इत्यादींचे |
| १६ भ्रांत | चित्र | : | राक्षस किन्नर देव दानवादींचे |
| १७ वास्तव | सचित्रग्रंथ | : | इतिहास, सुतारकी, लोहारकी इत्यादींच्या विशदीकरणार्थ |
| १८ भ्रांत | सचित्रग्रंथ | : | पुराणे, महात्मे, इन्फर्नो इत्यादीच्या विशदीकरणार्थ |
| १९ वास्तव | प्रकाशलेखन | : | फोटोग्राफी इत्यादी |
| २० भ्रांत | प्रकाशलेखन | : | आकाशांत कल्पनेने वगैरे पहाणे |
| २१ वास्तव | हावभाव | : | रोजचे अंगाचे विक्षेप |
| २२ भ्रांत | हावभाव | : | संचाराच्या वेळचे विक्षेप |
| २३ वास्तव | अभिनय | : | विक्षेपांचे वर्गीकरण करून शास्त्रात सांगितलेले |
| २४ भ्रांत | अभिनय | : | वेताळ, स्मशान, खंडोबा, इत्यादी संबंधक नेमके विक्षेप |
| २५ वास्तव | नृत्य | : | प्रसिद्ध आहे |
| २६ भ्रांत | नृत्य | : | पिंगा, अंगात येऊन नाचणे इ. इ. |
| २७ वास्तव | नाटक | : | मनुष्य समाज संसारदर्शक |
| २८ भ्रांत | नाटक | : | देवासुर पिशाच समाजदर्शक |
| २९ वास्तव | कळसूत्र | : | मनुष्याकृती बाहुल्यांचे |
| ३० भ्रांत | कळसूत्र | : | पिशाचाकृती बाहुल्यांचे |
| ३१ वास्तव | घनाकृती | : | पशुपक्ष्यादींच्या |
| ३२ भ्रात | घनाकृती | : | देवांदानवांच्या |
| ३३ वास्तव | भांडी | : | स्वयंपाकपात्रे, सामान्य, घरे, वाडे |
| ३४ भ्रांत | भांडी | : | देववेताळ यांच्या पूजेची साधी उपकरणी, दगडाची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | व लाकडाची देवाची साधी छपरे, साधे तकिये, ख्रिस्त्यांची साधी प्रार्थनामंदिरे, साधी थडगी, इ. इ. इ. |
| ३५ वास्तव | मूर्ती | : | पशुपक्ष्यादींच्या |
| ३६ भ्रांत | मूर्ती | : | रामकृष्ण, सैतान, देवदूत इत्यादींच्या |
| ३७ वास्तव | स्थापत्य | : | वाडे, किल्ले, कोट, घाट इत्यादी |
| ३८ भ्रांत | स्थापत्य | : | देवळे, चर्चे, मशिदी, इत्यादी |
| ३९ वास्तव | भूमिरचना | : | उद्याने, बागा, पदार्थसंग्रहभूमी, नगररचना |
| ४० भ्रांत | भूमिरचना | : | स्वर्ग, नरक, पाताळ, वायुलोक, चंद्रलोक इ. इ. |

अज्ञातोद्‌भव शबल साधने केवळ भ्रांतिकृत असतात. परंतु ती भ्रांतिकृत असतात असे मनुष्य समजत मात्र नाही, वास्तव साधनांच्या व कलांच्या इतकीच किंवा त्याहूनही जास्त खरी ती आहेत असा मनुष्याचा समज असतो. गूढ आवाज वगैरे मूळ पाया. त्यावर ती कोठून आली एतद्‌विषयी तर्क. माहीत असणाऱ्या कोणत्याही पदार्थांपासून आला नाही त्या अर्थी व कोण्यातरी प्राण्यापासून आला पाहिजे या अर्थी, उपमानप्रमाणे प्राथमिक मनुष्याने असे ठरविले की कोणत्याही अदृश्य प्राण्याचा हा आवाज असावा. आवाज झाडावरून, रानांतून सरोवरावरून, मेघांतून, आकाशांतून वगैरे जिकडून येईल तिकडे तो अद्दश्य प्राणी रहात असावा. असे नाना तर्क करून मनुष्याने भुते, यक्ष, देव, दानव, अप्सरा, गंधर्व, वेताळ, पिशाच, इत्यादी गूढ प्राणी प्रथम निर्माण केले. नंतर त्यांच्या रहाण्याच्या जागा, स्थले, प्रदेश व लोक निर्माण केले आणि शेवटी त्यांची त्यांच्या गुणानुरूप उपमानप्रमाणाने रूपे निर्माण केली. इतकेच करून मनुष्य थांबला नाही, तर हे अद्दश्य प्राणी रागावले म्हणजे पूजा, प्रार्थना, नैवेद्य व बळी देऊन त्यांची मर्जी संपादण्याचे मार्ग त्याने ठरविले. या मार्गांनाच देवधर्म म्हणतात. सुष्ट देव, दुष्ट देव, खाष्ट देव, वरिष्ठ देव, कनिष्ठ देव, प्रेष्ठ देव, श्रेष्ठ देव आणि एकमेव एक देव असे नाना प्रकारचे देव व देवदूत व भुते व सैताने व या सर्वांच्या स्त्रिया व पोरे असे एक नवीन जगच्याजग मनुष्याने निर्माण केले आणि ते जग खरे व मेल्यावर त्या खऱ्या जगात आपण अक्षय्य रहाण्याला जाणार, इतकेच नव्हे तर आपले हे दोन दिवसांचे साधे जग खोटे आणि खोटे नसले तर क्षणिक इत्यादी तर्कपरंपरा बांधीत बांधीत तो त्या खऱ्या परलोकावर बेसुमार आसक्त झाला. इतका आसक्त की, रोजची व्यवहारातली जी कर्मे, आयुधे, उपकरणी, चित्रे, मूर्ती, इमारती, थडगी, लग्ने, जातकरणे, पताका, वज, संस्कार इत्यादी सर्वांवर त्या खऱ्या जगातील वस्तूंना त्याने छाप मारला. त्या खऱ्या जगाची व तेथील देवादानवांची चित्रे, स्तोत्रे, वेद, बायबले, कुराणे, त्रिपिटके, काव्ये, नाटके, तांडवे देखील मनुष्याने केली. असा मोठा गोंधळ मनुष्याने माजवून ठेविला. खरेच खरे होते त्याला त्याने खोटे ठरविले आणि निव्वळ काल्पनिक जे होते त्याला खरे ठरविले. मनुष्याने ही जी कल्पनासृष्टी बनविली तिचे

उत्कट ऐतिहासिकरूप पहावयाचे असल्यास उत्तम मार्ग म्हटला म्हणजे कोणत्याही लोकांच्या देवळांकडे चला. म्हणजे मनुष्याच्या भ्रांत साधनांचा केवळ ऐतिहासिक संग्रह एका ठिकाणी केलेला तुम्हाला आयताच आढळेल. शहरांतले अलीकडील शेदीडशे वषातील देऊळ घेऊ नका. मुफस्सलमधील जुना विदीर्ण झालेला एखादा देऊळवाडा घ्या आणि ज्या भागात तो कालाने किंवा देऊळफोड्यांच्या हाताने छिन्नभिन्न झाला असेल ते भाग कल्पनेने एकत्र जुळवा. प्रथम जुनाट पिंपळ व वड यांचे पार लागतील. हे वृक्ष ब्राह्मण आहेत व यांच्यावर ब्रह्मराक्षस राहतात. भ्रांतदृष्ट्या ब्रह्मराक्षस म्हणजे एक व्यंतरयोनि समजतात. ऐतिहासिकदृष्ट्या ब्रह्मराक्षस म्हणजे ब्राह्मण व राक्षस यांच्यापासून झालेली एक पुरातन संकर जात समजली तर फारसे चुकणार नाही. ज्याकाळी देशात राक्षसांची वस्ती होती त्याकाळचा हा संकर असेल. या वृक्षांच्या पुढे एखादा म्हसोबा किंवा विरोबा किंवा पोटोबा लागेल. एक साधा ओबडधोबड दगड व त्याला शेंदूर फासलेला. चांगली नक्षीदार मूर्त करता आली नसती असे नाही. परंतु हे म्हसोबा वगैरे देव फार साधे व ओबडधोबडच असतात. त्यांच्या ओबडधोबडपणात इतिहास आहे. पुरातनकाली हे देव ज्या लोकांत अस्तित्वात आले त्यांना याहून जास्त कौशल्याची मूर्तिकला माहीत नव्हती आणि माहीत असली तत्रापि स्वयंभू ओबडधोबड मूर्तीपुढें कृत्रिम सुंदर मूर्तीची किंमत त्यांना वाटत नव्हती.

थोडे पुढे गेलात म्हणजे एका बाजूला वेताळसभा लागेल. हा वैशिष्ट्याने महारलोकांचा म्हणजे नागलोकातील एका कनिष्ठ जातीचा देव आहे. दुसऱ्या बाजूला दगडांच्या एका देवळात एक दगडी दिवा जळताना आढळेल. ही दगडी देवळी पितरांची आहे आणि दिवा रात्रंदिवस त्यांना उजेड दाखविण्याकरिता पाजळत आहे. दहा पाच हातांवर गावातील दोन चार सतींची देवळे लागलीत. त्यावर दांपत्य कोरलेले असते. नंतर मारुतीच्या देवळापाशी याल. वैदिककालीन मरुत् म्हणजेच पौराणिककालीन मारुति, मरुत्, मारुतः, मारुतिः अशी तिसरी पिढी आहे. मारुती हा पांथस्थांचा संरक्षक. याच्या पुढे देवडी व त्यावरील गोपुर भेटेल. गोपुरांत पूर्वी देऊळवाड्याच्या गाई बांधीत असत, सध्या तेथे वाजंत्र्यांचा ताफा रहातो. गोपुर पूर्वाभिमुख असून त्यातून प्राकारात - प्रदेशात जाण्याचा रस्ता आहे. प्राकार दोन अडीच पुरुष उंच असून त्याच्या विटा हातहात लांब आहेत. प्राकार दुमजली आहे. खालच्या मजल्यात चौफेर वोवऱ्या केल्या आहेत व वरच्या उगड्या मजल्यावरून शत्रूंवर तिरंदाजी किंवा गोळीबार करण्याकरिता तटात छिद्रे ठेविली आहेत. देऊळ एक प्रकारचा किल्लाच आहे. प्राकार दोन हजार वर्षापूर्वीच्या शकयवनांच्या धाडी परतविण्याकरिता तटांच्या धर्तीवर बांधलेला आहे. आत गेलात म्हणजे मध्ये एक दोन मुख्य देवळे व भोवताली उपदेवालये दिसतील आणि त्यांच्यापुढे दहा पाच उभ्या काठ्या आढळतील. एक काठी इंद्रध्वज आहे, दुसरी गरुडध्वज आहे, तिसरी सिंहध्वज आहे आणि चवथी रामदासी भगवा झेंडा आहे. साऱ्या ध्वजा ऐतिहासिक आहेत. इंद्रापासून समर्थांपर्यंत साऱ्यांचे ते ध्वज आहेत. भगवा झेंडाही इंद्रध्वजच आहे.

ध्वजदंड शब्दाचा मराठी अपभ्रंश ध्वजदंडः = झअअंडा = झेंडा आणि भगवान् जो इद्र त्याचा अपभ्रंश भगवा - भगवद्ध्वजदंडः = भगवाझेंडा. पांचवी काठी पेशव्यांच्या जरीपटक्याची आहे. जरीपटका म्हणजे पुन्हा इंद्रध्वजच. इंद्राच्या ध्वजाला जर्झर म्हणून संस्कृत नाव असे. पटक म्हणजे कापडाचा तुकडा. जर्झरकिपटकः = जरीपटका. जरीपटका म्हणजे इंद्राचे निशाण. पेशव्यांनी ते नवीन शोधून काढलेले नाही. वैदिककालापासूनचे ते जुनेच आहे. मध्ये मुसुलमानी धाडीत देवळातून लपून राहिले होते ते छत्रपतींनी व पेशव्यांनी सैन्यात पुन्हा प्रचलित केले इतकेच. या ऐतिहासिक काठ्यांच्या शेजारी अत्यंत जीर्ण झालेले, पावासापाण्याने झडलेले दहा पांच दगड तुमच्या सूक्ष्म नजरेखाली येतील. दगड पुरुष पुरुष किंवा अर्धा पुरुष उंच व हात पाऊण हात रुंद आहेत व त्यावर तीनचार मजली अर्धमूर्ती कोरलेल्या आहेत. कोरकाम ओबडधोबडच आहे.परंतु म्हसोबाबिरोबांच्याहून जास्त कुसरीचे आहे. एका मजल्यात शिवलिंग व स्त्रीपुरुष उपासक कोरलेले आहेत. दुसऱ्या मजल्यात भालेवाले घोडेस्वार कोरलेले आहेत. तिसऱ्या मजल्यात मोठमोठ्या ढुंगणाच्या नितंबिनी कुंभस्तनी महाराष्ट्र वधूटिका कोरलेल्या आहेत. या अर्धमूर्ती दगडांना कांदळ किंवा कांदळाचे दगड म्हणतात. महाराष्ट्रात असे एक गाव नाही की ज्यातील देवळाबाहेर, शेजारी किंवा आत हे कांदळ सापडणार नाहीत. हे कांदळ केव्हाचे? ज्या काळी पर्वतात व गुहात व दऱ्यात लेणी कोरण्याचे वारे महाराष्ट्रात शिरले तेव्हाचे. कांदळ हा शब्द कांदर या शब्दाचा अपभ्रंश. कंदरस्थ इदं कादरं. कंदर म्हणजे पर्वतातील कोरीव लेणे. हा कंदर शब्द वाल्मीकिरामायणात येतो. कंदरपूजा ऊर्फ लिंगपूजा महाराष्ट्रात फार जुनी आहे. बौद्धांपासून लिंगपूजकांचे संरक्षण करणारे भालेवाले कंदरांवर कोरलेले आहेत. बहुशः बौद्धांचा पराजय व लिंगपूजकांचा जय सुचविलेला असावा. ज्याअर्थी प्रत्येक खेड्यात कंदर सापडतात त्याअर्थी एका काली बौद्धांची व शैवांची मोठी दंगल महाराष्ट्रात होऊन गेली असावी असा तर्क होता. कांदळापैकी काही दगड अति जुने व काही अनुकरणाने केलेले बरेच म्हणजे फक्त पाचसातशे वर्षापलीकडील, अर्वाचीन असे दोन प्रकारचे असतात. या कांदळांशेजारी किंचित् अंतरावर वीर असतात. असुर, राक्षस, शक, यवन व मुसुलमान यांच्यापासून शौर्याने गावाचे संरक्षण करण्यात देह ज्यांनी खर्चिला त्यांचे पुतळे देवळाच्या आवारात बहुमानाने मांडून ठेवण्याची चाल महाराष्ट्रात असे. मूर्ती ग्राम्य गारागिरीच्या असतात व काहींच्या खाली लेखही कोरलेला असतो. मध्यवर्ती देवालय प्रायः शिवाचे किंवा विष्णूचे किंवा व कधी कधी दोहोची दोन देवळे असतात. कित्येक देवळे चालुक्यकालीन, कित्येक राष्ट्रकूटकालीन, कित्येक यादवकालीन व क्वचित् एखादे मुसुलमानकालीन असते. यादवकालीन व मुसुलमानकालीन देवळे साध्या हेमाडपंती घाटाची प्रसिद्ध आहेत. चालुक्यकालीन देवळे फार कलाकुसरीची व कारागिरीची असतात. प्रथम गरुड किंवा नंदी लागतो. नंतर सभामंडप सुरू होतो आणि गाभाऱ्याच्या प्रारंभाला जयविजयाची परवानगी मागावी लागते. ती मागताना गणराजांची व त्यांचे बंधू स्कंदराज यांची प्रार्थना केल्यावर

उंबरठ्याखालील कीर्तिमुखाला पायाखाली चिरडून आत प्रवेश जो करावा तो गर्भागाराची अपूर्व शोधा डोळ्यात भरते. येथे प्रेक्षकाचे चिमकुले मन भांबावून जाते. पहावे तरी काय काय? आधी कोणते पहावे आणि मागून कोणते पहावे? प्रथम गर्भागार पहावा की सभामंडप पहावा की प्राकारचित्रे पहावी याचा निश्चय होत नाही. कोठे इंद्रसभा व दशावतार यांची रंगीत चित्रे काढलेली आहेत, कोठे देवयोनी व गणदेवता यांच्या अर्धमूर्ती कोरल्या आहते, कोठे यक्षकिन्नरराक्षस यांच्या प्रतिमा घडलेल्या आहेत, कोठे तत्कालीन राजांच्या सभा चितारल्या आहते. हे सर्व नीट व साद्यान्त व सार्थ पहावयाला महिना पुरणार नाही. नुसती उपकरणीच घेतली तर तो अटनीवरचा शंख, सर्पाकृती पळी, कमलाकृती अभिषेकपात्र, मच्छाकृती धुपाटणे वगैरे वस्तूंतही इतिहास भरलेला सापडतो. देवळातून प्राकारांगणांत येऊन खुद्द देवालयाचा पायापासून शिखरापर्यंतचा घाट पहावा तर तोही किती आश्चर्यकारक? त्या मेहरपा, त्या जाळ्या, त्या मूर्ती, ते कोण, तो आकाशदिवा सर्वच काही विचित्र ! अंगणात नागशिला पडली आहे ती नागलोकांची स्मृती करून देते. पश्चिम देहलीने प्राकाराच्या बाहेर पडले म्हणजे अगदी नदीच्या पाण्यापर्यंत उतरलेला अर्धचंद्राकृती घाट लागतो. तेथे जलदेवतेचे देवालय आहे, संन्याशांच्या समाधी आहेत. चबुत्रे आहेत, सोडूनच शंभर हातांवर एक मशीद आहे, दुसऱ्या बाजूस मातीचा एक ढिगारा दिसतो तो कदाचित् बौद्धस्तूप असेल, पांचचार मैलांवर डोंगरांची रांग दिसते तीत पांडवलेणी आहेत. दरम्यानच्या अंतरांत ख्रिस्त्यांनी अलीकडे तीनचारशे वर्षात नवीनच उभारलेले एक क्याथोलिक चर्च आहे आणि त्याच्याच जोडीला समाजिस्टांचे दहावीस वर्षातले एक लहानसे साधे प्रार्थना मंदिर आहे.

१४. या सर्व देखाव्याचा अर्थ काय? गेल्या तीन हजार वर्षातील महाराष्ट्रातल्या लोकांच्या शबल, काल्पनिक व अवास्तव साधनांचे, कलांचे व मतांचे हे मूर्त प्रदर्शन आहे. याचा अर्थ तीन तऱ्हांनी करता येतो. केवळ श्रद्धालू जे आहेत त्यांना स्वर्गनरक ऊर्फ परलोक यांतील देवादींच्या कृती या देखाव्यात दिसतात व त्या खऱ्याहून खऱ्या ते मानतात. केवळ कलेचे व शिल्पाचे जे चुंचू आहेत ते मूर्तीचे डौल, इमारतीचा घाट, चित्रांचा उठाव, रंगाची भरदारी व कल्पनेची भरारी वर्णन करण्यात दंग होतात आणि असले शिल्प आता लोपले म्हणून शोक करतात. इतिहासाचे जे अभ्यासी आहेत त्यांना या देखाव्यात वरील दोघांच्याहून निराळा अर्थ दिसतो. सोंडेचा गणपती, पंखांचे देवदूत, चोचीचा गरुड, शेषशाई नारायण, चतुर्मुख ब्रह्मदेव, दशमुख रावण, घोडमुख्ये किन्नर, ऊर्ध्वशिख नारद, डोक्याच्यावर असलेला स्वर्ग व पायाच्याखाली असलेले पाताळ, हे सर्व भ्रांत कल्पनेचे खेळ आहेत, हे सर्वथैव खोटे आहेत आणि शुद्ध शास्त्रज्ञान जसजसे वाढत जाईल तसतसा याचा लोप कालांतराने झालाच पाहिजे हे इतिहासतज्ज्ञ जाणतो आणि लोपत जाणाऱ्या भ्रांत शिल्पाबद्दल हळहळत बसत नाही. उलटे, लोप अत्यंत मंदतम गतीने होत आहे याचे त्याला दुःख होते. स्थूल मूर्तीवरचा, चित्रावरचा व वृक्षपशुपक्ष्यादींच्या प्रतिमांवरचा तरी भ्रांत विश्वास अद्याप लुप्त कोठे झालेला आहे? आणि यद्यपि कोठेकोठे,

क्वचित् क्वचित् झाला, तत्रापि स्वर्ग, नरक, देव, देवदूत, जिहोव्वा, god, अल्ला, या अमूर्त भ्रांत कल्पना उद्याप सर्वत्र विराजमान आहेतच. फक्त अद्‍वैत वेदान्ती म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यातून व भौतिकशास्त्रज्ञ म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यातून काहीच्या ठाई या कल्पना नष्ट झालेल्या आहेत. परंतु या थोड्या काहीची संख्या पृथ्वीवरील एकंदर लोकसंख्येचा कितवा लक्षांश आहे? अद्याप जग, बाल्यावस्थेत कसले, शैशवावस्थेतच आहे.

१५. मनुष्यामात्राच्या या दीर्घकालीन म्हणजे लाखो वर्षाच्या शैशवावस्थेचा मंद इतिहास विचारविकारप्रदर्शनाच्यावरील शुद्‍ध व शबल चाळीस साधनांच्या स्थितिगतीवरून अल्पस्वल्प अनुमानता येतो. या इतिहासावरून असे दिसते की ईश्‍वर, आत्मा, परमात्मा, काल, दिक्, कारण इत्यादी शुद्‍ध किंवा शबल कल्पना स्वयंभू नसून मनुष्याने शुद्‍ध किंवा भ्रांत अनुमानाने बनविलेल्या आहेत. अनुभवाच्या अन्वयव्यतिरेकाने शुद्‍धाचे काही कण मनुष्याला गावले आहेत, बाकी सर्व साम्राज्य येथून-तेथून शबलाचे आहे. शबलांतून शुद्‍धाकडे गती होत आहे हे त्यातल्या त्यात समाधान. चमत्कार असा की, उत्क्रांतीकडे म्हणजे इतिहासाकडे अवर्णनीय दुर्लक्ष्य असलेले दिसते. नीतिकल्पना, ईश्वरकल्पना, कार्यकारणभावकल्पना, दिक्कल्पना, कालकल्पना, या सर्व कल्पना लाखो वर्षांच्या उत्क्रांतीने बनत आलेल्या आहेत हे बहुतेक कोणाताच तत्त्वज्ञ लक्षात घेत नाही. जो उठतो तो स्वयंभुत्वाकडे म्हणजे ईश्वरदत्तत्वाकडे ऊर्फ उपजतस्वभावाकडे धाव घेतो. जणू काय आज या घटकेला माणूस आकाशातून अचानक भूमितलावर पडला ! जणू काय त्याचा पाठीमागे लाखो वर्षाचा इतिहास नाहीच ! लाखो वर्षाच्या उत्क्रांतीने बनविलेल्या एका कल्पनेचती त्रोटक परंपरा देतो. त्यावरून वरील कल्पना व त्याचे स्वयंभुत्व ही दोन्ही किती भ्रांत्युद्‍भूत आहेत ते स्पष्ट होईल. अज्ञात प्रदेशातून ध्वनी ऐकू आला, माणूस दचकला, आजारी पडला, आजाराचे स्पष्ट कारण कळेना, सबब भूताची कल्पना केली. निरनिराळ्या अज्ञातोद्‍गम ध्वनींना, हावभावांना, आकाशचित्रांना, रोगांना, दुःखांना, जन्माला व मरणाला एक एक भूत कल्पिले. सुष्ट भूते व दुष्ट भूते निर्माण झाली. त्यांची उपासना सुरू झाली. नंतर रोगांची, सुखांची व दुःखांची खरी कारणे व तन्निवारक उपाय जसजसे कळू लागले, तसतशी सृष्ट भूतांची म्हणजे देवांची व दृष्ट भूतांची म्हणजे सैतानांची टर उडून जरूरी भासतनाशी झाली, विद्युत्पाताने मनुष्य मेला म्हणजे इंद्राने आपल्या वज्राने तो मारला अशी भ्रांत सजम असे व पटकीने माणूस मेला म्हणजे मरीदेवीने त्याला मारले अशी भ्रांत कल्पना असे. घराला विद्युतवाहक तार योग्यरीतीने लाविली म्हणजे विजेचे भय फारसे रहात नाही हे शास्त्रीय ज्ञान झाल्यावर, इंद्र व त्याचे वज्र ही दोन्ही भ्रांतिजन्य व काल्पनिक ठरतात व मनुष्याच्या मनातून दोघांची हकालपट्टी होते. तसेच शुद्‍ध हवापाणी असले म्हणजे मरीदेवीची गुमान भासत नाही. देवाची आणि देवीची जरूर कोठपर्यंत, तर संकटनिवारणाचे उपाय सुचले नाहीत तोपर्यंत. संकटनिवारणाचे जसजसे जास्त उपाय मनुष्याला सुचतात तसतसा तेवढ्यापुरता देवाला कमीतकमी त्रास द्यावयाचा किंवा तो देव काढून टाकून

पदभ्रष्ट करावयाचा परिपाठ मनुष्याचा आहे. अशारीतीने अनेक देव खोटे ठरल्यावर एकच एक देव मनुष्य प्रौढीने कल्पितो व आपणास शहाण्याचा शिरोमणी समजतो. पण हा एकमेव अद्‌वितीय देवही हजारो प्रसंगी उपयोगी पडत नाही. शेवटी त्या अद्‌वितीयालाही भिरकाटून देऊन, मनुष्य एक अद्‌वैतवेदान्ती तरी बनतो व ईश्वराला मायेच्या म्हणजे भ्रांतीच्या सदरात काढतो किंवा भौतिकशास्त्रज्ञ बनून कल्पिक ईश्वराच्या ताब्यातून संकटे निवारण्याचे काम आस्ते आस्ते बळकावीत जातो. तात्पर्य, कार्याचे खरे कारण जेथे जेथे सापडले नाही तेथे तेथे भूत किंवा देव हे कारण अज्ञ मनुष्य कल्पीत आलेला आहे व खरे कारण सापडले म्हणजे भूतकारणाला किंवा देवकारणाला रजा देण्याची त्याची वहिवाट आहे. तात्पर्य, देव ही कल्पना कृत्रिम आहे, स्वयंभू नाही.

१६. असो. वीस शुद्‌ध व वीस शबल मिळून चाळीस साधने विकारविचारप्रदर्शनाची वर्णिली. या चाळीस साधनांच्या साहाय्याने कोणत्याही देशाचा व तेथील भूत व वर्तमान लोकांचा इतिहास जाणावयाचा असतो. आपल्या महाराष्ट्रात व या भूमीतील भूत व वर्तमान लोकांचा इतिहास याच साधनांच्या साहाय्याने लिहिला जावयाचा आहे. अलीकडील पन्नास वर्षांत या चाळीस साधनांतून फक्त अक्षरसाधने जी कागदपत्रे व ग्रंथ, त्याकडे आपले विशेष लक्ष्य वेधून गेले. अल्पद्रव्यात अल्पश्रमाने सहजोपलब्धी याच साधनांची प्रथम होणे शक्य होते. तेव्हा झाले ते ठीकच झाले. परंतु या एका अक्षरसाधनाच्या उपलब्धीने सर्वच कार्यभाग आटपत नाही. अक्षर हे विचाराचे एक साधन झाले. अक्षराव्यतिरिक्त आणिक एकोणचाळीस साधने राहिली त्यांची वाट काय? अक्षराने सर्वच विचार प्रगट होतात असे नाही. अक्षराला साध्य नाहीत असे शुद्‌ध व शबल विचार गान, चित्र, मूर्ती, स्थापत्य साधतात. तेव्हा, याही साधनांचा यथायोग्य समाचार आपण घेतला पाहिजे. अक्षरसाधनसंशोधनातून हे संशोधन द्रव्यदृष्ट्या सापेक्षतः किंचित जड आहे. तत्रापि जड असो वा हलके असो, या संशोधनाविना महाराष्ट्रेतिहासाचे चित्र फारच फार कोते राहीले ते काही नाकबूल करता येत नाही. शिवाय अक्षरसाधन सर्वकाळी सारखेच उपलब्ध असते असे नाही. पाच चारशे वर्षे सोडली म्हणजे कागदपत्रांचे साहाय्य बंद होते; फक्त ग्रंथ राहतात. त्यांना पुष्टी, मूर्ती, चित्रे, स्थापत्य यांची द्यावी लागते. कित्येक कालाचा इतिहास तर अल्पस्वल्प अवशेषांवरून तर्काने अनुमानावयाचा असतो. अशा अडचणी आहेत. त्या टाळण्यास उपरिनिर्दिष्ट चाळीसही साधनांचे साहाय्य आवश्यक असल्यामुळे, त्यांच्यासंबंधाने वरील सोळा कलमात किंचित् प्रपंच करणे अगत्याचे भासले.

◆ ◆ ◆